म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १७४२
REFBK-0016623

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६२३
संदर्भ शाखा (स्थूल ग्रंथ)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थूलग्रंथ
अनुक्रम ४१००१ वि: निबंध
क्रमांक १८४२ नों. दि: ५/३/६८

# देवाचिये द्वारी

न. वि. गाडगीळ

पहिली आवृत्ती : जानेवारी १९६८

मूल्य रु. ३·००

चित्रकार : श्री. अनंत सालकर

प्रकाशक
सदाशिव कृष्ण पाध्ये
'तपश्चर्या'
व्हीनस प्रकाशन
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २

मुद्रक
श्री. कृ. वि. बोंद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार पेठ : पुणे २

४९००९ निबंध
१७४२ ५।३।६८

काही महिन्यांपूर्वी कै. ती. काकांचे स्मारक कशा प्रकारे करावे यासंबंधी एक अनौपचारिक चर्चा झाली. या चर्चेत असे ठरले की, त्यांच्या नावाने महाराष्ट्रातील एका विद्यापीठात राज्यशास्त्राचे अध्यापन निर्माण करावे; पुण्यात त्यांचा एक पुतळा उभारावा; आणि त्यांचे सर्व प्रकाशित आणि अप्रकाशित साहित्य संकलित स्वरूपात प्रसिद्ध करावे. या बाबतीतील मुख्य जबाबदारी अनुक्रमे ना. यशवंतराव चव्हाण, श्री. जयंतराव टिळक व मी स्वीकारावी.

या निर्णयानुसार गेल्या वर्षी त्यांच्या पहिल्या पुण्यतिथीच्या दिवशी ‘ चॉकोलेटची वडी ’ हा लेखसंग्रह मी प्रसिद्ध केला. आज दुसऱ्या पुण्यतिथीच्या दिवशी हा दुसरा लेखसंग्रह प्रसिद्ध करीत आहे.

‘ व्हीनस प्रकाशन ’चे श्री. भाऊसाहेब पाध्ये यांनी हे काम आपुलकीने पार पाडले, त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

मराठी वाचक कै. ती. काकांच्या इतर साहित्याप्रमाणेच या लेखसंग्रहाचेही स्वागत करतील याची मला खात्री आहे.

१२ जाने

REFBK-0016623

—विठ्ठल गाडगीळ

## अनुक्रम —


१ पासपोर्ट मिळाला, व्हिसा नाही ! १
२ अशी आहे भारत जनता ७
३ जे जे ‘ काळे ’ ते ते ‘ रत्नमय ’ १३
४ आई पण नाही ! १८
५ काकासाहेब, रिक्षा हवी का ? २५
६ भीमेच्या प्रवाहासंगे ३०
७ अभी तक उस्ताद नहीं मिला ! ३७
८ चंद्रभागा नव्हे भीमाच ! ४५
९ एकही गोड क्षण
यांनी ठेवला नाही ५०
१० देवाचिये द्वारी ५७
११ जगणे अपरिहार्य आहे म्हणूनच
जगत आहे ६४

ग्रंथालय ठाणे
क्र. १६६२३
(स्थळ प्रत)

# पासपोर्ट मिळाला, व्हिसा नाही !

' सतांसद्भिः संगः कथमपि पुण्येन भवति । ' सज्जन सज्जनांना भेटतच असतात. पण सामान्यजन– सज्जनांशी भेट झाल्यानंतर तेही प्रसंगी व तेवढ्या प्रसंगापुरते सज्जन होतात; निदान त्यांना तसे वाटते. मोक्षासाठी कोणी तीर्थयात्रा करतात; कोणी पुरश्चरणे करतात; कोणी योगसाधने करतात; तथापि हे सर्व वारंवार करावे लागते. ' दर्शनात् एव साधवः ' असे म्हणतात. कष्टसाध्य मोक्ष साधुपुरुषांचे दर्शन घेताच ताबडतोब प्राप्त होतो असा त्याचा अर्थ आहे. श्रद्धेने परित्यक्त केलेल्या मनाला हे पटणार नाही. श्रद्धा व शंका यांत घड्याळातील लंबकाप्रमाणे हेलपाटे घालणाऱ्या मनाला, हालणाऱ्या मनाला काही क्षण काही निराळे वाटेल व त्याही बाबतीत ते हेलकावे खाईल. तथापि ज्याप्रमाणे घड्याळातील काट्याची गती ही लंबकाच्या फेऱ्यावर अवलंबून असते त्याचप्रमाणे असल्या मनाची प्रगतीही या अर्धवट वृत्तीच्या विचाराच्या आंदोलनावरच अवलंबून असते. काही मने अशी असतात की, कितीही पाऊस पडला तरी ज्याप्रमाणे खडक अंगावर पाणी राहू देत नाही, अगर मांजर अंग झटकून अंगावरील पाणी बाहेर टाकते, तशी असतात. कुठल्याही प्रसंगाची मधुरता, कोणत्याही घटनेची रमणीयता असल्या मनांना स्वतःची उंची वाढू देण्याला असमर्थ असतात. तिसऱ्या वर्गात मी नाही. त्यांच्या विचारांतील काठिण्य माझ्या मनाचे नाही. दुसऱ्या वर्गातील दोलायमान वृत्तीचा थोडासा मान माझ्या मनाने अनेक प्रसंगी स्वीकृत केला आहे. पहिल्या वर्गात जाण्याचा माझा प्रयत्न आहे, अद्यापि यश आले नाही. तात्पर्य, श्रद्धेवर बुद्धीची सावली

आणि बुद्धीवर श्रद्धेची शाल पडली आहे. याचाच साक्षात्कार दि. १७ जानेवारीला पवनार येथील परमधाम आश्रमात विनोबांना भेटण्यास गेलो त्या वेळी झाला.

विनोबा, मी व शंकरराव देव असे तिघेही १९१४ साली बडोदा कॉलेजमध्ये एकाच वर्गात विद्यार्थी होतो. हा एक योगायोगच म्हणावयाचा. विनोबांचे पूर्वज आणि माझे पूर्वज कोकणातील वेळणेश्वर व त्याजवळील खेडेगावातून देशावर आले. वाईत अद्यापिही त्यांचे वंशज कोणी ना कोणी तरी राहात आहेत. बडोद्यात असताना शंकररावांची ओळख झाली होती. विनोबांना वर्गात असल्याचे फक्त आठवते. १९२० नंतर शंकरराव देव व मी निकटवर्ती झालो. राजकारणातले साथी व सहकारी म्हणून गेली ४० वर्षे वागत आलो. पण विनोबांचा परिचय मात्र १९३४ सालानंतरच अधिक झाला. राजापूरची गंगा जशी बारा वर्षांनी येते, अगर अर्धकुंभ जसा सहा वर्षांनी, आणि सिंहस्थ १२ वर्षांनी येतो, त्याप्रमाणे माझ्या व विनोबांच्या गाठीभेटीचा इतिहास आहे.

पंजाबमध्ये १९६० साली ते आले होते त्या वेळी पंजाबच्या सरहद्दीवर मी त्यांचे स्वागत केले होते. तसेच त्यांचे स्वागत, अठावन्न साली कर्नाटकातून ते महाराष्ट्रात आले त्या वेळीही केले होते. त्या दिवशीच्या त्यांच्या अपूर्व संगतीच्या लाभावर एक ‘ अपूर्व प्रभात ’ म्हणून लेखही लिहिला होता. १९५८ मध्ये पुन्हा नेवासे या पुण्यक्षेत्री त्यांच्या संगतीत काही काळ घालविला होता. आणि जेव्हा एका सुप्रभाती राजस्थानच्या वाळवंटातून पदयात्रा करीत करीत लोहारूजवळ मी ‘ पंजाबचा राज्यपाल ’ ह्या नात्याने त्यांचे स्वागत केले व जो आनंद अनुभवला त्याचे वर्णन शब्दांनी करणे शक्य नाही. कुणी तरी त्यांना तुमच्या स्वागतार्थ राज्यपाल येणार असल्याचे सांगितले. त्यावर त्यांनी उत्तर दिले की, ‘ नव्हे– माझे गुरुबंधू येणार आहेत.’ माझ्या मनाने त्यांच्या भेटीस जाताना, अधिकाराची ती कवचकुंडले राजभवनातच सोडून दिली होती. पंजाबमध्ये राजपुरा, चंदीगड, सोनपत अशा तीन ठिकाणी मी त्यांच्या गाठी घेतल्या. एका मुक्कामात तर गाठ पडण्याआधी केशवराव जेध्यांच्या निधनाचे वृत्त त्यांनी

वाचले होते. ते मला म्हणाले, " केशवराव पुढं गेले, आता तयारी करा." मी म्हणालो, " मला विचारणार आहेत का ? तसं म्हणाल तर जन्माच्या वेळीच हा क्षण निश्चित केला आहे. पाळण्याबरोबरच ताटीचीही तयारी निर्मात्यानं केली आहे." अन्य गोष्टींवर चर्चा होऊन विनोबाजींनी यमुना पार केली आणि मी चंदीगडला परतलो.

त्यानंतर क्वचित क्वचित पत्रव्यवहार होतच होता. मध्यंतरी त्यांची प्रकृती बिघडल्याची वर्तमाने ऐकली होती. पुन्हा भेट होईल ही सुतराम् कल्पना नव्हती. त्यांची पदयात्रा खंडित, अखंडित चालूच होती, आणि पंजाबमधून राज्यपदातून बाहेर पडल्यानंतर माझीही जिव्हायात्रा अडखळत पण अखंडितपणे चालूच आहे. आणि जिव्हायात्रेची जोड पदयात्रेला असल्याने " ब्राह्मण हिंडतु भला " हा साक्षात्कार मला होत आहे.

याच यज्ञकर्मातील वारूच्या मागे हिंडत हिंडत १६ जानेवारीला नागपुरे फणीपुरे मुक्कामाला मी आलो होतो. तेथे युक्तिवाद आणि राजकारण ह्यावर तीन व्याख्याने द्यावयाची होती, आणि १७ तारखेला वर्ध्याला माध्यमिक शिक्षकांच्या परिषदेला ' मार्गदर्शन ' करण्यास जावयाचे होते. रस्त्यावरच पवनार येथील परमधाम आश्रम आहे, तेव्हा शिक्षकांचे शिक्षक विनोबा यांना भेटण्याचे मी ठरवले. त्याचप्रमाणे सतराच्या सुप्रभाती पवना नदीच्या तीरी नितान्त रमणीय वातावरणात विनोबांची भेट घेतली. काही वर्षांपूर्वी त्यांनी मी हा परमधाम आश्रम पहावा असे सुचविले होते, कारण ते त्यांच्या अध्यात्माच्या वारस संपत्तीचे स्थान आहे, आणि त्या-प्रमाणे १९६३ च्या १२ फेब्रुवारीला म्हणजे सर्वोदयाच्या दिवशी मी तेथे गेलो होतो आणि तेथील त्या पवित्र दिवसाच्या सोहोळ्यात भागीदार झालो होतो.

परवा मी पायऱ्या चढून विनोबांच्या झोपडीजवळ गेलो, परिचित लोकांनी स्वागत केले, आणि दोनतीन मिनिटांतच विनोबाही आले. त्यांच्या स्वरूपात बदल झाला होता. मिशा व दाढी यांनी सत्तात्याग व स्थानत्याग केला होता असे दिसले. किंबहुना त्यांचे ऋषिस्वरूप नाहीसे होऊन, संन्यासाची दीक्षा त्यांच्या मनाने यापूर्वीच घेतली असली तरी त्यांचे लौकिक स्वरूप

तेथे दिसून आले. दृष्टी पण मंद झालीसे वाटले. उभयता एकमेकांना भेटलो. हातात हात घालून जणू काही एकमेकांनी दिलेल्या वचनाची पूर्ती व पावती दिली, आणि कदाचित दोघांच्याही मनात पुन्हा केव्हा भेटू असेही विचार आले असतील. निदान माझ्या तरी आले.

त्यांना आता बधिरत्व आले होते, आणि जे ऐकले नाही त्यावर बोलण्याची राजकारणी वृत्ती त्यांची नसल्याने त्यांनी बोलणे पण सोडले होते. मोठी दक्षता, मोठी सावधानता– जी सर्वत्र असावी असे रामदास सांगतात, तीच ते दाखवीत होते. आम्ही दोघेही मग बसलो आणि त्यांनी वही पुढे केली. त्यावर लिहिलेला मजकूर त्यांनी दाखविला. त्यात लिहिले होते की, " दोन्ही भाऊ शेजारी शेजारी आणि गाठ नाही संसारी." मी ते वाचून थक्क झालो; आणि माझे मन अनेक विचारांच्या जाळ्यात सापडले.

मी पण मग त्याच वहीवर लिहिले की, " नागपूरला आलो होतो, भेट घेऊन जावे म्हणून आलो आहे. आता वारंवार भेट होणे मुष्किल झाले आहे."

त्यांनी लिहिले, " मी आता भारताच्या मध्यात आहे. तेव्हा आता भेट होणे अवघड नाही."

त्यांच्या मनात असो– नसो, ' मध्य ' शब्दातील श्लेष माझ्या किंचित साहित्यिक मनाने काढला. पण तो तसाच ठेवून मी लिहिले की, " आता ७० वे वर्ष सुरू झाले आहे. Over draft account सुरू झाला आहे. तेव्हा केव्हा हुंडी अस्वीकृत होईल, कोणी सांगावे ? "

विनोबा हे माझ्यापेक्षा चार महिन्यांनी मोठे आहेत. त्यांनी लागलीच लिहिले की, ' पासपोर्ट मिळाला आहे; व्हिसा मिळावयाचा आहे.' त्याचा अर्थ मी समजलो.

या देशातून– स्वदेशातून, या जीवनातून, या कर्मक्षेत्रातून बाहेर जाण्याची परवानगी मिळाली आहे. मिळाली नाही ती कोठे जावयाची, त्याची ! येथून कोठे जाणार ? ' स्वकर्मानुगो गच्छति जीव एकः '– 'आपापल्या कर्मा-प्रमाणे मनुष्य त्या त्या लोकाप्रत जातो ' ही गीतेची शिकवणूक डोळ्यांपुढे उभी राहिली. त्या एका वाक्यात साऱ्या जीवनाचा सिद्धान्त व तत्त्वज्ञान

त्यांनी उभे केले. ब्रह्मसूत्रांपैकी एका सूत्राप्रमाणे ते सूत्र अल्पाक्षरी होते. पण अनंत अर्थ त्यात सामावला होता. 'अनंत पारं खलु शब्दशास्त्रम्' असे सूत्र आहे, तेच खरे आहे. आपापले काम करीत मनुष्याने जगावयाचे आहे. मग ते शरद्ऋतू शंभर असतील, अगर त्यांचा अन्त 'शाश्वतीसमाः' असेही असेल ! पण जे जिवंत राहावयाचे आहे ते 'कुर्वन् इह कर्माणि' कार्य करीत करीत करावयाचे आहे.

जीवनामध्ये आपण काय केले हे सर्वच काही जगाला माहीत नसते. पण मनाच्या वहीत साऱ्या कृत्यांची ही नोंद असतेच. चांगल्या व वाईट. इतकेच काय पण मनाने स्वतःशीसुद्धा चोरून ठेवलेले विचार त्यात नमूद असतात. चित्रगुप्त कोणी जगाबाहेरील यंत्रणा नाही. त्याचे कार्यालय अगर सचिवालय व्यक्तीच्या मनातच असते. आणि म्हणून व्यक्तीला मृत्यूनंतर आपण कोठे जाऊ याबद्दल शंका असण्याचे कारण नाही.

म्हणूनच मग मी मोठ्या उत्सुकतेने या चित्रगुप्ताची खतावणी पाहू लागलो. घटकाभर आरोपीलाच न्यायाधीश केले. अपराध्याला चौकशीचे काम दिले आणि तपास करू लागलो. आपण काही निंद्य, अश्रेयस्कर असे काही केले का ? कनक आणि कान्ता यांच्या प्रलोभनाला बळी पडलो का ? जाणूनबुजून खोटे बोललो का ? असत्य जाणून सत्याचा मुलामा चढविला का ? तपास करता तसे काही झाले आहे असे आढळून येईना. तथापि हा इतिवृत्तान्त वरचा मालक मानील का ? त्याने दिलेल्या जीवनाचा मुशाहिरा जास्तीत जास्त खिदमत करून मी मिळविला होता असे मन सांगत होते.

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत मी पाहू लागलो. साहित्यात 'प्रतिभासाधन 'गिरी केली नाही, किंचित् प्रतिभेच्या जोरावर मोठा पसारा उभारला हे खरे, पण त्यातही कधी कोठे काळा बाजार केला नाही. अगदीच ज्ञानेश्वरीत सांगितल्याप्रमाणे चातुर्य लपविले नाही, सन्मान चुकवला नाही, पण खाकरून त्याचे लक्ष वेधले असेही नाही. अर्थात ही माझी समजूत आहे. काही टीकाकार अन्यथा म्हणतील तर त्यांना तो अधिकार मीच राखून ठेवीत आहे. राजकारणात 'सीधी उंगलीसे घी भी नहीं निकलता' ह्याप्रमाणे वागणुकीचे बोट वाकडे करून घृत काढण्याचा

प्रयत्न मी केला नाही. पण त्याचबरोबर काही टीकाकारांनी ‘ बेरकी ’ म्हणून, ‘ पाताळयंत्री ’ म्हणून गौरव केला नाही असेही झाले नाही.

मला कुठल्या जीवलोकात घालणार हा पेचप्रसंग ईश्वराला सोडविणे कठीण आहे; आणि म्हणूनच कदाचित ‘ व्हिसा ’ मिळायला वेळ लागेल असा विचार मनात येऊ लागला.

पुन्हा बुद्धिवादी मन गुणगुणू लागले की, भस्मीभूत देहाला येथे अगर तेथे, इकडे अगर तिकडे, आत अगर बाहेर, आज अगर उद्या– असे काही असूच शकत नाही. आत्मा अमर मानला तर त्यालाही तीच परिस्थिती वेष्टित करीत असते. पाप केले नाही असे माझे म्हणणे, पुण्य केले नाही अशी जग साक्ष देईल. तथापि सर्वोत्तम न्यायालयात सर्वश्रेष्ठ न्यायाधीश याला न्याय द्यावाच लागेल. आणि न्यायाच्या सिद्धान्ताप्रमाणे निर्णय देण्या-पूर्वी माझे म्हणणे लेखी व तोंडी त्याला ऐकावेच लागेल. हे सर्व मनात असताना, ‘ व्हिसा ’ लवकर मिळणार नाही असेच वाटले. पण कार्य करीत करीत जीवन व्यतीत करावयाचे आहे हेच मनात घोळत घोळत, परमधाम पाठीशी घालून, पश्चिम दिशेकडे मी वळलो. सूर्य पूर्वेला होता व त्याच्या प्रकाशातच मी चाललो होतो या कल्पनेने माझे मन मोहरून आले !

* * *

# अशी आहे भारत-जनता

चालणाऱ्या मनुष्याचे भाग्य चालत असते, बसणाऱ्याचे रुसून बसते, उभे राहणाऱ्याचे तिष्ठत राहते,– अशा अर्थाचे एक सुभाषित आहे. मला वाटते प्रतिभा ही थोडी तशाच स्वरूपाची असते. बसली म्हणजे बसते, उभी असली म्हणजे टवकारून पाहते आणि चालू लागली म्हणजे चालू लागते. मन परिस्थितीच्या संदर्भाने वावरत असते आणि मनाच्या संदर्भाने प्रतिभा पदक्षेप करीत असते. खुर्चीवर नसलो म्हणजे सामान्यपणे मन स्थितिशील होते. जे अतीत आहे, ज्याच्याबाबत आता गती चिंतिता येत नाही अशाचा विचार करते. दिवाणखान्यात सहज फिरत असलो म्हणजे मनही मालकाबरोबर कुत्र्याने जावे त्याप्रमाणे चालत असते. मनुष्याची छाया दिवसाच त्याच्या मागे अगर सभोवती राहते. मनाचा हा साथी अगर गुप्त हेर चोवीस तासमुद्धा शरीराला सोडून जात नाही. लौकिक जीवनात गुप्त हेर अन्यांना बातम्या देतो पण हा हेर स्वतःच्याच बातम्या स्वतःलाच देत असतो. कुणाला बघितले, कुणाच्या वळचणीखाली उभे राहून ऐकले, कुणाला सहज धक्का दिला, कुणाचे साहित्य खुबीने हस्तगत केले, कुणाचे मन चोरले, कुणाला ते गुप्तपणे दिले, या साऱ्या खटपटी व लटपटी सूक्ष्म सूक्ष्म तपशिलासुद्धा हा बित्तंबातमीदार बिनचूकपणे देत असतो व कार्यक्षम अधिकाऱ्याप्रमाणे मन त्याची नोंद करीत असते. शरीराची सावली किंवा छाया बरोबर असून अडथळा करीत नाही, आणि नेहमीच काळी व एक दृष्टीने स्थितप्रज्ञासारखी असते. मनाची सावली मात्र अनेक प्रसंगी अडथळा करीत असते. ज्या वेळेला पुढे नसावी असे वाटते, त्याच वेळी अनेक

विचारांची अडगळ, अनेक स्मृतींची खापरे पुढे टाकून अपशकून करीत असते. त्याचबरोबर धैर्य सोडून जात असताना, आशा मालवली असताना रम्य प्रकाश दिसावा, कर्मगीतेतील प्रोत्साहक आवाज कानी यावा, हीही कामगिरी ती करीत असते; आणि ज्या वेळी मनापुढे सर्व कंटकशल्ये मावळली आहेत आणि झपूर्झासारखी परिस्थिती उत्पन्न झाली आहे, त्या वेळी पण कधीही न सोडणारी ही मदतीला धावत असते, व त्याही स्थितीतून सुविचाराची काठी हाती देऊन पुढे नेत असते.– आणि असेच काही तरी वातावरण त्या दिवशी पुणे शहरातील स्टेशनवर गाडीची वाट पहात असताना निर्माण झाले होते.

त्या रात्री मला सोलापूरला जायचे होते,– बँक नोकरांच्या संमेलनाला जायचे होते. वास्तविक आता माझा व बँकेचा संबंध उरला नव्हता. काही वर्षांपूर्वी स्टेट बँक ऑफ इंडियाचा व्हाइस चेअरमन– उपसभापती होतो. एवढाच संबंध आयुष्यात बँकेशी आला होता. जन्मभर लक्ष्मीशी संबंध बेताबाताचाच आला,– आणि तिचा लौकिक गुणिजनांजवळ रहावयाचे नाही, आणि म्हणूनच ती नसल्यामुळे मी गुणिजन आहे, असा अभिमान वाटतो. काही वर्षे पुणे सेन्ट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेत संचालक म्हणून होतो पण संचालन असे काही केले नाही. किंबहुना तेथील मॅनेजर एवढा दक्ष असे की संचालनाचे परिश्रम तो संचालकावर क्वचितच लादत असे. तात्पर्य– बँकेच्या व्यवसायाशी असा आणि इतकाच संबंध होता. तथापि, राजकारणी पुरुष ज्ञानाच्या क्षेत्रात आपल्याला काही अज्ञात आहे असे कधीच मानीत नाही. अनुभवाच्या क्षेत्रात त्याचे पाऊल सर्वत्र पडलेले असते, असे त्याला प्रामाणिकपणे वाटते. आणि जेथे नसेल तेथे परकायाप्रवेश करून ज्याप्रमाणे शंकराचार्यांनी अनुभव मिळविला त्याप्रमाणे तो हस्तकाद्वारे मिळवीत असतो. आणि त्याची हिकमत ही की, त्याला पाहिजे तसाच अर्थ त्या घटनेतून काढण्याची लकब– त्याच्या मनाचा स्वाभाविक धर्म असतो. चूक निर्णायक आहे, असे कळले तरी ती एक नैतिक भांडवल आहे, असे तिचे मूल्यांकन तो करत असतो. आपल्या योजना फसल्या तर नैतिक विजय झाला, असे तो प्रतिपादितो, आणि ‘ विद्यमान परिस्थितीत अन्यथा काय होणार होते ? ’

असा दिलासा आपल्या अंध अनुयायांना तो देत असतो. अशाच तऱ्हेचा थोडा वादविवाद पुणे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर एका मित्राशी करत करत जिना ओलांडून संबंधित प्लॅटफॉर्मवर मी आलो. आमच्या वादाचा विषय नेहेमीप्रमाणे हवापाण्याचा नव्हता. अजून हवेचा काळाबाजार अगर साठा ' महान त्यागी ' देशभक्त व्यापाऱ्यांनी केला नव्हता. पाण्याच्या बाबतीत अन्न कमी कमी होत गेल्याने अगर करत गेल्याने त्या मानाने पाण्याचा पुरवठा कमी कमी होत असला तरी, एका अर्थाने जीवनाचे गाणे सुरेल व तालबद्ध होत होते. अन्न असेल तर पाणी लागते असे निदान व्याकरणाचार्यांचा विचार दिसून येतो आणि म्हणूनच अन्नपाणी असा समास त्यांनी केला आहे. आणि आपल्या व्यवहारात अन्नपाणी असेल तोपर्यंतच मनुष्य त्या मुक्कामाला राहतो. योजनाचातुर्य पंडित अशा कॉंग्रेस सरकारने अन्नाच्या बाबतीत आहारापेक्षा निराहार श्रेष्ठ असे प्रामाणिकपणे मानून सुंदर योजना गेल्या दोन वर्षे आखल्या आहेत आणि देशभर जनतेचे स्वास्थ्य चांगले रहावे, असा श्रेष्ठ उद्देश ठेवून कार्य चालविले आहे.

माझ्याबरोबर आलेल्या माणसाने व तेथील रेल्वे अधिकाऱ्याने मी प्रतीक्षालयात थांबावे असे सुचविले. खुर्ची तरी आणू का ? म्हणून विचारले, तेही नाकारले; आणि पुलाजवळच अनेक यात्रेकरू आपापल्या सामानाजवळ बसले होते तसाच मी बसलो. फरक एवढाच की, मी माझ्या सामानावर बसलो. गुप्त धनावर नाग बसतो असे म्हणतात; त्याप्रमाणे गुप्त धन नसता व नागाचा देश नसता मी बसलो होतो. उजव्या बाजूला एक तरुण जोडपे बसले होते. काय बोलत होते हे मी ऐकले नाही, किंबहुना ऐकावयाचे नाही असे ठरवून दुर्लक्ष केले होते. गृहात न मिळणारी शान्तता व एकान्त त्यांना त्या गर्दीत लाभला होता असे वाटत होते. दुसऱ्या बाजूला एक मध्यमवयीन बाई ४–५ मुले घेऊन बसली होती,– स्तनाशी एक व पायापाशी २–३ या प्रमाणात तिची परिस्थिती होती. उघड उघड तिने परिवार-नियोजनाला अमान्यता देऊन भारतीय संस्कृतीचा आदर्श ती दाखवीत आहे, असे कोण्याही सनातनी अगर जनसंघीय माणसाचे खास मत झाले असते, व ह्या आर्य स्त्रीबद्दल अभिमान वाटला असता. खाण्यासाठी पोरे चिडचिड करीत होती, जे तिने दिले होते ते त्यांना पसंत नव्हते असे

दिसत होते. ती रागावत होती, पण त्या रागातसुद्धा तिचे वात्सल्य वाकड्या करंजीत आत मधुर खिसमिसयुक्त मसाला असावा असे ते रागावणे होते. मी त्या खाद्य वस्तूंकडे पाहिले. माझी पांढरपेशी संस्कृती काळीठिक्कर पडली. ते खाद्य काय होते ? अमेरिकन गव्हाचे होते, पंजाबी गव्हाचे होते, का गावरान गव्हाचे होते ? किंबहुना गव्हाचे तरी होते का ? का तांदळाचे होते का धान्याचे होते, का कोठल्या तरी पिठात काही तरी मिसळून अमृतलाल व्यापाऱ्याने त्यातून अमृततुल्य असे काही तर केले नव्हते ना ? आधीच सरकारी धोरणाने दाण्यांच्या कण्या झाल्या आहेत, कण्यांमध्ये कचरा मिसळून व्यापारी कौशल्याने संतोषभुवनातील कचोरी झाली आहे, असे काही तरी विचार करीत असतानाच तिच्या दोन हातांपैकी एका हाताने त्यांतील एका शिशूला तिने थोबाडीत मारली.

मुलाच्या मुखाला एक अलौकिक कार्य प्राप्त करून दिले. मुलाच्या रडण्याकडे त्या प्लॅटफॉर्मवर जाणाऱ्या येणाऱ्या कोणाचेही लक्ष गेले नाही, कारण ते नित्याचे दृश्य झाले होते. मला ते तितके नित्याचे नव्हते, व अलीकडे अलीकडे तथाकथित मोठेपणामुळे अगर लादलेल्या मोठेपणामुळे असले प्रसंग कमी कमी दिसू लागत आले आहेत. मुलाचे रडणे ऐकून मी म्हणालो, " बाई, का मुलाला मारलंत ? " " सारखी मेली वसवस करतात, जे मिळेल ते मी दिलं आहे, जे बाजारात मिळतं ते त्यांनी घरी आणलं आणि हेही पुरत नाही. पैसे नाहीत म्हणून आणखी आणीत नाही. रोजगार नाही, म्हणून कामासाठी आम्ही सोलापूरला जात आहोत." तिच्या त्या शब्दांत बहुसंख्याक भारतीयांची समस्या शब्दांकित झाली होती. तिच्याजवळ जे काही होते ते बहुतेक जुन्या बाजारात घेतलेले दिसत होते, पण निश्चितपणे ते जीर्ण व जुने झाले होते. एका मुलाला स्तनाशी घेऊन ती युगाची माता होते हे स्पष्ट होते, भविष्याची पोषणदेवता होती. उद्याची काळजी वाहणारी ती मूर्तिमंत चिंता होती. क्षणाच्या पत्नीचा परिणाम काय होतो हे तिच्याभोवती टाहो फोडणारी, ओरडणारी, चिडचिडणारी लहान मुले दाखवीत होती. भारताचा अतीत, विद्यमान व भविष्य हा तिच्या रूपाने सदेह झाला होता. अतीताचा दोष तिच्याकडे नव्हता. विद्य-

मानाचा थोडा होता. भविष्याबद्दल दोषी नव्हती पण वर्तमानातील अनुभव लक्षात घेऊन निःसंशयपणे भविष्य उज्ज्वल करण्याची तिची पात्रता होती. त्या परिसरात इष्कीने चालणाऱ्या अशोककुमार शैलीचे नवयुवक वावरताना दिसत होते. नानाविध वेशभूषा, केशभूषा वारंवार डोक्याकडे हात नेऊन स्वतःच्या समाधानापेक्षा लोकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने करणाऱ्या तरुणी दिसत होत्या. ज्या बाईशी मी बोलत होतो, तिची अन्नसमस्या तर मी पाहिलीच, वस्त्रसमस्या माझे अद्यापि आधुनिक न झालेले डोळे पाहू शकत नव्हते. मुलांच्या पोशाखाबद्दल काय सांगू ? ते थंडीचे दिवस होते, तथापि सुती कापडासुद्धा पुरेसा नव्हता. निवास असा कुठेच नसावा. याप्रमाणे ते कुटुंब अनिकेतन होते. "शय्या भूमीतले, ज्ञानामृतं भोजनं" ही योग्यांची दोनतृतीयांश वृत्ती तिच्या जीवनात स्पष्ट दिसत होती. तिच्या चेहऱ्यावरुन, एकंदर परिस्थितीवरुन, ज्ञानामृतापासून ती निदान चार पिढ्या दूर असली पाहिजे असे वाटत होते.

त्या परिरुरात इतकी मंडळी जात येत होती की जीवनाचा प्रवाह अखंड वाहात आहे ह्याचा साक्षात्कार झाला आणि मी त्या ठिकाणी माझ्या सामानावर बसून विचारमग्न होत होतो. तिने दिलेल्या उत्तराने माझी शंकावृत्ती निश्चेष्ट झाली. चौकशी करणारा नेहमीचा स्वभाव, स्वधर्म विसरला. क्षणभर त्या मुलांना जवळ घ्यावे असे वाटले, पण तेही तिच्या स्वाभिमानाला पटेल की नाही याची खात्री नव्हती. अमेरिकन मदत देणारे यांच्यासारखा मी गैरमुत्सद्दी नव्हतो. कोणाला दान द्यावे ही बुद्धी माझ्यात नाही. जे आपल्याला मिळाले आहे, ते समाजाने ऋण म्हणून दिले आहे, ते त्याला परत द्यायचे ही माझी भूमिका. तथापि, प्रसंगी अहंभाव त्या कृतीला पुरस्काराचे व दानाचे स्वरूप देतो व त्यातील श्रेष्ठ व आध्यात्मिक भाव नाहीसा करतो. 'दानः संविभागः' हे श्रेष्ठ उपनिषदाचे तत्त्वज्ञान. तथापि अन्य तत्त्वज्ञानाप्रमाणे यालाही आजच्या जगात व्यापारी स्वरूप आले आहे. ते देण्याची, दिल्याची, प्रसंगाची जाहिरात व चित्रे वर्तमानपत्रातून आली म्हणजे धन्यता वाटते. मलाही ती वाटते, अगदी गुप्तपणे वाटते अशीच साक्ष माझे मन देईल. ती मुले रडत होती.

कारण एक रडू लागले म्हणून बाकीची रडू लागली. कारण एकाला मिळालेला मार सर्वांना लागला होता. पोलिसांनी कोठल्या तरी गावी अन्नाची मागणी करणाऱ्या, रोजगाराची मागणी करणाऱ्या लोकांवर केलेला लाठीहल्ला,– त्याचे वळ सर्वांच्या पाठीवर व मनावर उमटतात, आणि तसा वृत्तान्त वाचला म्हणजे माझीही स्थिती तशीच होते. मुलांना काही तरी द्यावे असे वाटत होते आणि माझ्या पाथेयात निळूने दिलेला चिवड्याचा लहानसा पुडा होता. आणि मग काहीही विचार न करता तो मी त्या मुलांना दिला. बाई किंचित स्तिमित झाली. मी म्हणालो, " माझ्या नातवंडांसारखी आहेत–" आणि या मधुर शब्दांचा परिणाम झाला व मुलांना तिने तो घेण्यास सांगितले. एवढ्यात गाडी आल्याची गडबड झाली. हमाल आला आणि गर्दीतून ती स्त्री-- २ बोचकी व ३-४ मुले असे सर्व घेऊन कुठल्या तरी डब्यात गेली. मी मात्र पहिल्या वर्गाच्या डब्यात तिसऱ्या वर्गाच्या डब्यातल्या उतारूच्या मनाने प्रवेश केला आणि किती तरी वेळ ते दृश्य डोळ्यांपुढे पाहात पाहात निद्रावश झालो.

* * *

४९००९ निबंध
१७४२ ५८३१९८

# कॉँग्रेसच्या राजवटीत जे जे 'काळे' ते ते 'रत्नमय' प्रकाशित झाले!

एकोणीसशे पंधरा साली मुंबई कॉँग्रेसच्या अधिवेशनाला मी हजर होतो, पण प्रेक्षक या नात्याने. अधिवेशन डिसेंबरात भरले होते व मंडपही फारसा मोठा नव्हता. प्रतिनिधिगण क्वचितच धोतर नेसलेले असे दिसत होते. अध्यक्ष सिंह होते, तेच पुढे लॉर्ड सिंह झाले. भाषा इंग्रजी, वातावरण सभ्य व शान्ततेचे. टाळ्यासुद्धा मोजक्या व माफक. त्यात आर्तता नव्हती, आवेश तर त्या वातावरणात परका ठरला असता! परवाचे दुर्गापूर अधिवेशन म्हणजे पन्नास वर्षांनी भरलेले सुवर्णमहोत्सवी अधिवेशन; पण त्या दोन अधिवेशनांत केवढे अंतर-- अगदी जमीन अस्मानाचे!

१९१९ साली मुंबईस जे खास अधिवेशन झाले त्याला प्रतिनिधी म्हणून हजर होतो. पण कुठे हात वर करण्यापलीकडे काही भाग घेतला नाही. वीस सालच्या नागपूरच्या कॉँग्रेस अधिवेशनापासून तर वारकऱ्याच्या निष्ठेने जेथे जेथे अधिवेशन भरे, तेथे तेथे पंढरीला जावे तसे आजतागायत मी जात आलो आहे.

पंढरपूरला जितका भक्तिभाव अजून दिसून येतो, तितका आता कॉँग्रेसच्या पंढरीत--ती दुमदुमत असली तरी-- दिसून येत नाही! बडवे व उत्पात यांचे बंड त्या पंढरपूरला कमी झाले. ह्या पंढरीत मात्र ते नित्य वाढत आहे.

दुर्गापूरला जाताना मनात आले होते की– तेथे काय दिसेल? भुवने-

श्वरला जे घडले, तसेच अर्थशून्य वातावरण असेल का ? काही चैतन्य त्या दुर्गेच्या पुरात दिसेल का ? राष्ट्राचे पाऊल काही पुढे पडेल का ? दारिद्र्याची पकड काही अंशी तरी सुटेल का ? काही नैतिक अधःपतन थांबेल का ? आणि असे विचार मनात घोळत असतानाच गाडीवरील नावाकडे सहज लक्ष गेले. नाव होते–' Black Diamond ' म्हणजे ' काळे रत्न '. ते पाहताच मी सर्द झालो ! काही दिवसांपूर्वी हिला Coal Field Express म्हणत. पण नव्या रेल्वे मंत्र्यांच्या कारकीर्दीत हे नवे नाव दिले गेले असे कळले ! काँग्रेसच्या राजवटीत जे जे काळे ते ते रत्नमय झाले आहे, व जे जे धवल व चारित्र्यसंपन्न ते ते त्याज्य व अप्रस्तुत ठरले आहे असाच ह्या घटनेचा अर्थ होय !

नवनाथांचे संमेलन असावे असे स्वातंत्र्यापूर्वीच्या काँग्रेसचे स्वरूप असे. मंडप शुभ्र, चारित्र्य धवल, मने ध्येयनिष्ठ, हृदये श्रेष्ठ धैर्याने विनटलेली;–ती काँग्रेस, तसली अधिवेशने आता इतिहासजमा झाली ! याचेच प्रात्यक्षिक दुर्गापूर येथे दिसणार असे मला वाटले.

गाडी चालू होण्याच्या एक मिनिट आधी ४–५ संसद सदस्य मी बसलेल्या डब्यात आले. त्यात एक महाराष्ट्रीय होते आणि म्हणूनच मला त्यांनी ओळखले. त्याचा परिणाम एवढाच झाला की, अन्य सभासद अधिक सभ्यतेने व सौजन्याने वागू लागले. तथापि रामेश्वरी ज्याप्रमाणे भिक्षुकवर्ग जमला असता ' क्षणा 'च्या गोष्टी करतो, यजमानाने दिलेल्या दक्षिणेबाबत टीका करतो, त्याचप्रमाणे केवळ व्यावसायिक प्रश्न त्यांच्या चर्चेचे विषय झालेले ऐकू येत होते. यथाप्रसंगी मीही असेच केले असेल यात काही शंका नाही.

माझी संसद आता चार भिंतींनी मर्यादित नव्हती. आणि सभासदांची संख्या हजारांनी मोजण्यासारखी होती. कोणी हुकूमसिंग माझ्या संसदेचे नियंत्रण करणारा नाही, वक्तृत्वाला म्हणून अफाट स्वरूप आले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

मधून मधून मी त्यांच्या चर्चेकडे लक्ष देत होतो ! भारतात काय चालले आहे, ह्याची संपूर्ण जाणीव त्यांना होती, असे म्हणण्याचे धारिष्ट मी

करणार नाही, अधिवेशनाच्या निमित्ताने नवे शहर वसवावयाचे, नव्या सुखसोई करावयाच्या, ही दृष्टी अयोग्य नव्हे, पण त्यातही तारतम्य हवे. अधिवेशनासाठी प्रचंड रकमेचा अहेर काँग्रेसने मिळविला होता. असल्या बातम्या तेथे जाण्यापूर्वीच ऐकत होतो. तेथे असतानाही ऐकल्या; ज्यांना झळ लागली त्यांपैकी काहींनी सांगितल्या. आता वर्तमानपत्रातून त्याची चर्चा वाचीत आहे. त्यामुळेच क्षणभर गाडीला दिलेले ' Black Diamond ' हे नाव यथार्थच ठरले असे वाटले.

अर्ध्या तासाच्या आत अधिवेशनाच्या ठिकाणी उपस्थित झालो. अध्यक्ष बदलले तरी ए. आय्. सी. सी.च्या दप्तरात काम करणारी मंडळी इन्द्रायणी स्वरूपाची असते. त्यांनी मला पाहताच एक मिनिटाच्या आत सर्व प्रवेश-पत्रिका इत्यादी आभूषणे बहाल केली. विषय-निर्वाचिनीत अणुबाँबवर चर्चा चालू होती. स्फोटाएवढा प्रचंड आवाज जरी तेथे निघत नव्हता तरी अगदीच भूपाळी स्वरातही वक्ते बोलत नव्हते !

पेटवलेली मशाल अंधारात मार्ग दाखविण्यासाठी आहे; इतरांची घरे जाळण्यासाठी नाही, हे तोंडाने म्हणूनसुद्धा कोणत्या क्षणी काय बुद्धी होईल ह्याचा भरवसा नसतो; आणि शब्दाने आन्तरराष्ट्रीय राजकारणात कोणी बनणार नाही, म्हणून सत्य हे प्रथम, सत्य हे मध्य, व सत्य हे अंती ह्या तिन्ही अवस्थांत स्पष्टपणे सांगणे हे इष्ट आहे, असे माझे मत मी महा-मंत्र्यांनाही सांगितले. अणुबाँब प्रकरणीचे त्यांचेही पण भाषण जरा मोघमच झाले. भारताने युद्धाच्या दृष्टीने, संरक्षणाच्या दृष्टीनेसुद्धा, अणुबाँब उत्पादन करण्याचे ठरविले तर पाक त्या स्पर्धेत पडेल आणि मग साऱ्या जगभर त्या स्पर्धेचे क्षेत्र वाढेल, आणि जग हे सतत सुळावर चढवलेल्या, फाशीची दोरी गळ्याला लागलेल्या पण खटका अद्यापि न ओढलेल्या, परिस्थितीत राहील यात शंका नाही.

विषय निर्वाचन कमिटीच्या मंडपात सभासदांची उपस्थिती इतकी कमी होती की, ह्या बाबतीत हे अधिवेशन विक्रमी ठरले ! ६०० सभासदांपैकी फक्त २१० हजर होते. प्रेक्षकगण हजाराच्या आतच होता. रंगमंचावर काँग्रेस प्रतिष्ठेला अनुसरून काही पाय पसरून, काही तिरपे, काही ओबड-

धोबड रीतीने बसलेले दिसत होते. लग्नगृही जसा अस्ताव्यस्त कारभार चालतो त्याप्रमाणे ती बैठक दिसत होती. पार्श्वभूमीच्या पडद्यावर गांधी व जवाहरलाल यांची चित्रे होती, आणि त्यांत गांधी खिन्न दिसत होते व नेहरू कावलेले वाटत होते. मला वाटते, या चित्रांनी वास्तववादी परिस्थिती डोळ्यांपुढे उभी केली होती. गांधीजींचे सारे जीवन सत्यासाठी होते,– ते आजच्या काँग्रेस जीवनातून हद्दपार झालेले आहे. गांधीजींच्या अहिंसेला विद्यमान सरकारनेच गोळी घालून ठार मारले आहे. बायबलमध्ये ' भाकरी मागितली असता दगड देण्यात आला.' असे लिहिले आहे. आजच्या राज्यकर्त्यांच्या युगात ह्या नीतीचे आधुनिकीकरण झालेले आहे. अन्न मागण्यासाठी आलेल्या जमावावर आता गोळीबार करण्यात येतो. अस्तेय म्हणजे जरूरीपेक्षा जास्त ठेवणे ही चोरी हे बापूजींचे व्रत अभावाने तळपत आहे. जरूरीपेक्षा जे अधिक आहे तेच अपुरे वाटावे, असा आज व्यक्तींचा व शासनाचा कुलधर्म झाला आहे.

पगार वाढवावेत व व्यापाऱ्यांनी भाव वाढवावेत, गरिबांवर कर लादून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष त्यांच्याकडून घेऊन सरकारी नोकर व व्यापारी ह्यांची घरे भरावी, असा यज्ञ अखंडपणे चालू आहे.

गांधीजींचा अपरिग्रह आता ध्येयशून्यतेचा सिद्धान्त ठरला आहे. सारा समाज मुळातच परिग्रही आहे, आणि आता परिग्रहवादी होणे म्हणजे प्रगतीचे लक्षण होय, अशा नव्या अध्यात्मनीतीचा सिद्धान्त होऊ पहात आहे.

साधे जीवन म्हणजे दारिद्र्याची पूजा ठरली आहे. उच्च विचारसरणी म्हणजे वेडगळपणा असा समज सर्वत्र उत्पन्न झाला आहे. आदर्शवाद आक्रसला आहे, ध्येयवाद उदासीनतेच्या, निष्फलतेच्या उकिरड्यावर वस्ती करून राहिला आहे. आता भोगवादाची पताका हाती घेऊन समाजाने जावे हे सोदाहरण आजचे शासनकर्ते, त्यांचे राजकीय भाऊबंद जगाला दाखवीत आहेत. आणि हे पाहूनच की काय, गांधीजी खिन्न होऊन नेहरूं-कडे बघत आहेत. " तुझ्या कर्तृत्वाचेच का हे फळ ? " असे जणू त्यांना विचारीत आहेत,– असे त्या चित्राकडे पाहताना वाटले. नेहरूंच्या चेहऱ्यावर

कावलेपणाची छटा दिसली. कुवतीबाहेर प्रकरण गेले म्हणजे मनुष्य जसा कावतो तशीच स्थिती नेहरूंची झाली.

अन्नाच्या प्रश्नापासून अणुबाँबच्या पक्षापर्यंत एकही प्रश्न हयातीत सुटला नाही व त्यांचे वारस ते सोडवू शकणार नाहीत, हाच अर्थ त्यांच्या नजरे-तून मी काढला. दोन्ही चित्रांजवळ जाऊन नम्रपणे पाहिले. काही प्रेरणा येण्याऐवजी वरील विचारच माझ्या मनात आले. शेजारी बसलेल्या एका मध्यवर्ती मंत्र्याशी मी बोललो. तो म्हणाला, " हम क्या करें ? ये तो उनकीही देन है ! " ' आम्ही काय करावे ? त्यांनीच ही अव्यवस्था व हा वारसा आम्हांला दिला आहे ! '

दुर्गापूर अधिवेशनात आर्थिक ठरावावर मी बोललो. ' यमराज ' कामराज यांनी मला वेळेचे बंधन घातले नाही. ' अकरा वर्षांपूर्वी पास केलेल्या ठरावाची ही अकरावी आवृत्ती आहे. ह्या मणभर शब्दांत एक कणभरसुद्धा अर्थ नाही ' असे तळमळीने मी बोललो. टाळ्या मिळाल्या पण ह्यापलीकडे काही झाले नाही ! प्रत्येकजण परिस्थिती गंभीर असल्याचे सांगत होता. छपरा जिल्ह्यातील सभासदाने कंदमुळे खाऊन लोक राहात आहेत, तीन रु. किलो तांदूळ झाले आहेत असे सुनावले. दुसऱ्या एकाने सांगितले की, ' लोक रस्त्यावरले कण कण वेचीत आहेत. ' तथापि, हे सारे स्थितप्रज्ञ मनाने अगर गावरान भाषेत निगरगट्टपणे शासनाची सूत्रे ज्यांच्या हाती आहेत ते ऐकत होते. शास्त्रीजी गंभीरपणे बोलले आणि सबूरीने घ्या हाच राग त्यांनी आलापिला. मला त्यांनी बोलावले व सांगितले की, ' शक्य तेवढे करीत आहे. ' मी म्हणालो, ' हातात काठी घेऊन, तिला दोरी लावून शान्तपणं तळ्यात मासा पकडण्यासारखं हे बोलणं होत आहे. पण प्रसंग निराळा आहे. आता तुफान सुरू झालं आहे. तेव्हा त्याला तोंड देता येईल असं काही तरी करा, तसं नेतृत्व हवं आहे. लवकरच गगनभेदी लाटा उसळतील आणि कदाचित सर्वच वाहात जाऊ. ' त्यांच्या मनावर काय परिणाम झाला हे सांगू शकत नाही. भोवतालच्या समुदायात जे होते त्यांत

तळमळीचा संपूर्ण अभाव दिसत होता. ते सर्व शिकारी होते— जीवनात व शासनात ! वाघाला शेळीची मनःस्थिती कशी कळणार ?

गेली पन्नास वर्षे त्या काँग्रेस-मंदिरात श्रद्धेने मी सालोसाल जात आलो. पण आता येथे शुभ्र रंगाच्या प्राण्यांच्या कलकलाटाव्यतिरिक्त काही ऐकू येत नाही ! ‘ ज्या काळाने हे दृश्य दाखवले त्याला नमस्कार असो ! ’ हे भर्तृहरीचे शब्द मनोमन उच्चारीत मी माझ्या ‘ वनवासा ’ला परत निघालो.

* * *

# आई पण नाही !

' ओळखलं का मला ? ' हे अडखळत बोललेले शब्द मी ऐकले. मलाच उद्देशून होते ते. एका सामाजिक संस्थेच्या समारंभानिमित्ताने त्या ठिकाणी मी गेलो होतो. गेल्या अर्ध्या शतकात, तुरुंगातील मुक्काम सोडून बाहेर असताना, काही कार्यक्रम नाही असा क्वचितच दिवस गेला असेल. माझ्या येण्याने ' मंडपास शोभा येणारे ' प्रसंग, ' मार्गदर्शन ' अपेक्षिणारे असंख्य लोक, प्रेरणा देणारे भाषण ऐकणारा श्रोतृवृंद, इत्यादी इत्यादी प्रसंग दररोज होत असत, व आजही होत आहेत.

सत्कार व समाचार, स्तुती व निंदा ह्या दोन चाकांवर माझा जीवनरथ चालू आहे. इच्छा असो अगर नसो, उद्विग्नता येत नाही, अति हर्ष होत नाही, ह्या सुख-दुःखांचे समीकरण यदृच्छया करीत आहे. हा वागणुकीचा अंकुर चिंतनाच्या बीजापासून आलेला नाही; घडत घडत घडले आहे. म्हणून असल्या प्रसंगाच्या निमित्ताने अगर मिषाने समाजजीवनातील चांगले व वाईट मी हेरत असतो. ' भिक्षामिषे शोधावे जन ' ह्याऐवजी ' समारंभविशेषे जनमन ' शोधत असतो. नाना तऱ्हेची माणसे भेटतात. सामान्यपणे बरे बोलतात. त्यातील एखादा तरी अस्सल ' पुणेकर ' भेटतो. कोठल्या तरी लिखाणातील चूक दाखवतो. वागणुकीत राजकीयदृष्ट्या गैर झाले असेही गंभीरपणे सांगतो. त्याचबरोबर मी न केलेले कार्य अगर किंचित केलेले कार्य कणाचा पर्वत करून सांगणारेही भेटतात. ते सर्व संतृप्त

असतात असे नाही. कार्यसाधूपणाचे पांघरूण घेतलेलेही काही असतात. अर्थात स्तुतीच्या महावस्त्रावरील किंमत बरीच बाद करावयाची असते.

तीन तपांचा हा अनुभव आहे. याही प्रसंगी मी मुख्य पाहुणा होतो सर्वांचा परिचय असला तरी ह्या सामाजिक समारंभाच्या संदर्भात, मुख्य वक्ता पाहुणाच असतो. आणि त्याची 'ओळख' अगर 'परिचय' जेव्हा औपचारिकपणे केला जातो, त्या वेळी इतिहासाचा खून होतो! न केलेले पुण्यकर्म पदरी बांधले जाते. न केलेल्या कर्तृत्वाची मुंडणावळ अगर बाशिंग डोक्याला बांधले जाते. तसेच त्याही दिवशी झाले! पण हे नेहमीचे असल्याने अपरिचित असे अगर अकस्मात असे तेथे काही नव्हते.

कोणी तरी मला राज्यपालपदाच्या निवृत्तीनंतर विचारले, 'सध्या काय करता?'

गंभीरपणे त्याला सांगितले, 'दुय्यम धंदा अध्यक्ष होण्याचा आहे. अध्यक्ष म्हणजे ज्याची नजर वरची आहे, सर्वत्र आहे, तो अधिक अक्ष आणि मी ह्या बाबतीत दक्ष आहे.'

'स्थानापन्न' झाल्याबरोबर, सूत्रे हातात घेतल्याबरोबर सर्वत्र पाहतो, नको असलेले लोक पाहतो, हवे असलेले लोक पाहतो, आणि ज्यांना दूर ठेवावे असे बातमीदार पण जवळ आलेले पाहतो. ध चा मा करण्यात ही पलटण मोठी पटाईत! त्या दिवशी निर्विघ्नपणे सर्व पार पडले होते. अल्पोपाहार– ज्याचा अल्पपणा चहाच्या कपापुरता सार्थपणे मर्यादित होता– तो झाल्यानंतर परत जाताना खोलीच्या दारात उभ्या असलेल्या एका स्त्रीने प्रारंभीचे शब्द उच्चारले!

मला माझ्या स्मृतीचा मोठा अभिमान आहे. पडछायेप्रमाणे ती सतत मजजवळ राहते. अजून रुसली नाही, रागावली नाही, घटस्फोट तर शक्यच नाही. तथापि, त्या क्षणी मात्र मी गांगरलो. धांदलीत दरवाजाच्या किल्ल्या व गाडीत बसताना पैशाचे पाकीट घरी राहिले असे व्हावे,– तसे थोडेसे झाले.

सुमारे पाच क्षण तिच्याकडे टक लावून मी पाहात होतो. तिचे वय व माझे वय लक्षात घेता ह्या प्रसंगाचा विपरीत अर्थ कोणीच करणार नाही,

राज्य ग्रंथ संग्रहालय, ठाणे. (स्थळ)


ही खात्री होती. मध्यम उंचीची, देशस्थी रंगाची, नाक डोळे सतेज असलेली, बांध्याने सुदृढ अशी ती साठीच्या घरातील स्त्री होती. तिचे डोळे माझ्याकडे टक लावून पाहात होते, मीही तसेच करीत होतो. आणि अंधारात चाचपडत असताना हरवलेले सापडावे तसेच झाले. ते डोळे पाहिल्याचे आठवले, ते नाक, ते ओठ, ते रुंद कपाळ– सर्व आठवले. त्या कपाळावर आता कुंकुमतिलक नव्हता, आणि सुमारे पंचावन्न वर्षांपूर्वीची स्मरण-दप्तरातील खातेवही पुढे आली.

'अवर्णनीय नाम परकलत्रम्' हे खरे होते. तथापि मी वर्णन केलेली स्त्री परकलत्र असली तरी मनाच्या नात्याने भगिनीसमान होती. आणि पंचावन्न वर्षांपूर्वीचे आजोळच्या सिद्धटेकचे स्मरण झाले. देवळातील सभामंडपात सकाळी, दुपारी आम्ही लहान मुले गोंधळ व गडबड उडवीत असू. त्यात धोतरे नेसलेली मुले क्वचितच होती; काही लंगोटीत व काही तुमानीत. आणि ती तुमान म्हणजे पिंजारी स्टाइलची, आणि मुली साऱ्या परकरी होत्या. न उमललेल्या कळ्या, फांदी न फुटलेले वृक्ष ! शिवाशिवी, त्यावरून भांडणे, त्यावरूनच रुसणे, आणि त्यातून समजूत होऊन पुनर्मीलन– असा तो कार्यक्रम अव्याहत चालू असे.

दा. क्र. १६६२३

श्री सिद्धिविनायकाचे वृद्ध ब्रह्मचारी पुजारी. त्यांच्या दुपारच्या झोपेचा भंग आमच्या उनाडक्यांनी होई, पण त्यांनी कधी शाप दिला नाही, अगर वावगा शब्दसुद्धा उच्चारला नाही. मंडपाच्या कोपऱ्यात असलेला वृद्ध सेवेकरी, त्याच्या गणेशपुराण वाचनात अडथळा येतो म्हणून कधी तोही रागावला नाही. आणि त्या बालमित्र मंडळीत अकरा-बारा वर्षांचा मी होतो, आणि त्यातच आज समोर वृद्ध दिसत असलेली पण त्या वेळी परकरी मुलगी होती,– असे स्मृतीच्या वही-खात्यात आढळून आले. आणि एकदम मी 'यमे– ' म्हणून संबोधले. तिचे वय लक्षात घेतले नाही. माझ्या प्रतिष्ठेला शोभेल का नाही हेही लक्षात घेतले नाही. अनौपचारिकतेतील आपुलकी स्वाभाविकपणे प्रकट झाली. ती म्हणाली, "होय. आणि तुम्ही ओळखलंत तर मला." मी म्हणालो, "तू ओळखलं असं म्हण. म्हणजे मला आनंद होईल. 'तू'

म्हणणारे आता कोणी राहिले नाही. आई वडील तर केव्हाच गेले. थोरले भाऊ, चुलत भाऊबहीण, चुलते यांनीही तोच रस्ता धरला, आणि बायको आधुनिक नसल्यानं तीही अहो जाहोच म्हणते.'' माझ्या विनोदाने ती हसली. कदाचित लहानपणीचा वात्रटपणा आत्ताच्याही विनोदात तिला आढळून आला असेल! आणि मग पुढे म्हणाली, "किती दिवस मी तुझ्याकडे येणार होते, मला वहिनींना पाह्यचं आहे." मी म्हणालो, "पाहण्यासारखी वहिनी आता राहिली नाही. जी आहे ती तुझं स्वागतच करील." आणि मग मोठ्या औत्सुक्याने विचारले, "आता आजी झाली असशील." पण त्या प्रश्नाला अनपेक्षित असे उत्तर तिने दिले! पेढा घेण्यासाठी हात पुढे करावा आणि दुसरेच काही तरी हाती यावे तसे झाले! तिने खाली मान घालून 'आईसुद्धा नाही' एवढेच शब्द उच्चारले. त्याचा जो काय अर्थ समजायचा तो मी समजलो.

आम्ही दोघे समारंभातून बाहेर आलो, आणि रस्त्यावर १०–१५ मिनिटे तिची हकीकत मी ऐकली. त्या १५ मिनिटांत ५० वर्षांचा करुणास्पद इतिहास कळला. तो एका व्यक्तीचा असला तरी समाजाच्या व्याकरणात लिहिला गेला होता. नऊ वर्षांच्या यमूला देशस्थी पद्धतीप्रमाणे साटीलोटी करून चाळीशी वयाच्या कुलकर्णी वृत्तीच्या गृहस्थास दिली. त्या वेळी कुलकर्णी वतने होती.

वैतरिणीची कुलकर्णीगिरी म्हणजे मोठा अधिकार, मोठी प्राप्ती होती. स्वर्गात वैतरणी व खाली कुलकर्णी यांना वगळून, दुर्लक्षून कोणाला इहलोकी अगर परलोकी सुख भेटले नाही असा त्या वेळचा सामाजिक अनुभव होता.

तसे म्हटले तर सासर बऱ्यापैकी होते. थोडी शेतीवाडी, ५–१० वर्षांतून येणारी कुलकर्णी वतनाची पाळी ह्यातून गुजारा होत होता. कुलकर्णी वतने जप्त करण्याची प्रभात किंवा संध्याकाळ एक दशक पुढे होती, तथापि 'कुलकर्णी-लीलामृत' हा प्रचंड ग्रंथ प्रसिद्ध झाला होता. वतनजप्तीचे वातावरण सुरू झाले होते. विधवा सून घरामध्ये नांदवणे कर्तव्य असले तरी कोणी ते करण्यास उत्सुक नव्हते. त्या काळच्या तरुण विधवेची दुःखे

हरिभाऊ आपटे यांच्या कादंबरीतच सत्यसृष्टीइतकी लोकांना वाचावयास मिळत होती. दिवसभर दिरांच्या मुलांचे काम करावे, जावांची बोलणी खावीत, नणंदांचे वाग्बाण सहन करावे व कुठे तरी कोपऱ्यात पडावे. तेही जीवन तिच्या वाट्यास आले नव्हते. साधारण २–३ वर्षे सिद्धटेकास राहून ती पुण्यात भावाकडे गेली. आणि तेथेही त्या काळी किंचित अप्रतिष्ठापूर्ण मानलेले काम म्हणजे घरी विड्या वळून ४–२ आणे मिळविणे हे ती करीत असे !

पुढे सेवासदनात ती शिकू लागली. डोळ्यांना नवीन दृष्टी आली. माणुसकीची जाणीव होऊ लागली. व्ह. फा. झाली. ट्रेनिंग घेतले आणि पुणे जिल्ह्यातील एका खेडेगावात शिक्षिका झाली. त्या जीवनात तिला अडचणी आल्या. स्त्रीचे स्त्रीत्व– ह्यातील शक्ती व सामर्थ्य तिला प्रसंगी दाखवावे लागले. मोरयाच्या कृपेने ती सुरक्षित राहिली. पुढे १५ वर्षे खेडेगाववजा शहरात काढली; आणि आता निवृत्त होऊन, मिळत असलेल्या पेन्शनमध्ये भागत नाही म्हणून ६० वर्षांच्या वयात, सामाजिक संस्थेत काम करीत म्हातारपणी ४०–४५ रुपयांत आपला गुजारा होईल ह्या श्रद्धेने ती वागत होती.

बदलणाऱ्या जगात रुपयाने पण आपली किंमत बदलली. आकाश बदलले, जमीन बदलली आणि रुपया गुलमहंमदइतका हट्टी नसल्याने तोही बदलला. कोटींच्या कवड्या झाल्या. हा इतिहास तिचा व्यक्तीचा असला तरी साऱ्या समाजाच्या दुःखाचा असाच तोंडावळा आहे.

मी तिला विचारले, " तू मला कसं ओळखलंस ? मीही बदललो आहे, स्वरूपात बदल आहे, सर्व दृष्टींनी बदललो आहे." त्यावर ती म्हणाली, " गेल्या ४० वर्षांत मी वर्तमानपत्रं वाचत आहे. फोटोखाली नाव असल्यानं बदलणारे फोटोही अपरिचित नाहीत. तुझ्याबद्दल वाचून आनंद होतो." मी म्हणालो, " टीका वाचतेस का ? " " शब्द सोडून वाचण्याची लहान मुलाप्रमाणं मलाही सवय आहे, म्हणून टीका गाळून वाचते. आणि जगात दुःस्वास करणारे काय कमी असतात ? " मी म्हणालो, " त्यांचंही म्हणणं खरं असतं. आत्मविश्वासानं बोललं तर त्याला भंपकपणा म्हणतात ! तत्त्वाला

चिकटून राहिलं तर हट्टी व अव्यवहारी म्हणतात. सफलतेसाठी बदल केला तर धोरणी न म्हणता संधिसाधू म्हणतात. आणि असा निंदक एखाद दुसरा तरी शेजारी असावा, असं मला वाटतं."

तिला काय वाटले ते मी सांगू शकत नाही. चांगला बोलतो एवढेच तिला वाटत असावे असे दिसले. तिने घरचा पत्ता दिला. मी येईन म्हणून सांगितले. एखाद्या तपस्विनीप्रमाणे तिचे जीवन होते. ज्योत संपत असता तेल घालून ती वाढवावी असे ते होते. संसार, संतती, प्रेम, इत्यादी साऱ्या नाजूक व मंगल भावना तिच्या मनाच्या मार्गावर कधीच आल्या नव्हत्या हेच खरे. आणि जेव्हा ती म्हणाली, 'आईसुद्धा नाही' त्या वेळी साऱ्या स्त्रीजीवनाच्या युगां जे न्यून असते व जे तसे वाटते त्याची अभिव्यक्ती सूत्रवत त्या शब्दांत तिने केली होती. ती उपेक्षित होती व वंचित होती. तथापि, ज्यापासून वंचित आहोत त्या भावनेशी ती अपरिचित नव्हती. ती आपल्या घराकडे गेली, आणि मी माझ्या घराकडे वळलो,– पण मनात 'आईसुद्धा नाही' हे करुणकाव्य सारखे निनादत होते.

* * *

# काकासाहेब, रिक्षा हवी का ?

मे महिना म्हणजे पुण्यात वसंत व्याख्यानमाला, परिषदा, परिसंवाद, आणि त्यात लग्नांची भर. ' एकोणीसशे वीस–तीस ' सालच्या काळात असे होत असे की, मे महिन्यामध्ये वसंत व्याख्यानमाला चालू असली तरी दुपारी बहुशः जेवण बाहेरच होत असे. तोच वांगीभात, तीच जिलबी, तोच मठ्ठा,– कुठे रायत्यात, लोणच्यात एखाददुसरा बदल. जणू काही त्यात काही फेरफार केल्यास लग्न अवैध ठरायचे इतका सारखेपणा त्यात होता. १९४७ ते १९५२ या मंत्रिपर्वात दरसाल अंदाजे तीनशेवर ' रिसेप्शने ' होत की जेथे मी हजर असे तेथेही तेच पदार्थ, तेच केक्स, तीच बर्फी, तोच चहा, तेच आइस्क्रिम, आणि– तीच ती मंडळी, तेच पुरुष. त्यांच्या संभाषणात आत्मप्रौढी व परनिंदा याशिवाय काही मिळावयाचे नाही. त्याच त्या स्त्रिया,– दिवसभर सावळ्या असलेल्या पण संध्याकाळच्या समारंभांना गोऱ्यापान दिसणाऱ्या– असे जीवन होते. दिल्लीत आता त्याहूनही सारखेपणा आला. महागाईने ते क्षेत्र वगळले आहे असे वाटते.

पुण्यात मात्र गेल्या महायुद्धानंतर भयंकर फरक पडला आहे. आता मात्र घरी लग्ने होत नाहीत. मंगल कार्यालये झाली आहेत. आता दोन दोन महिने आधी लग्न ठरत नाही. मुलीच्या आईला अगर मुलाच्या आईला शेजारणी-पाजारणींना बोलावून गव्हल्यापासून ते रुखवतापर्यंत तयारी करावी लागत नाही. कारण आता तसला शेजारधर्म शिल्लक राहिला नाही. आता चौकी वाडे राहिले नाहीत. ' फ्लॅट–ब्लॉक्स ' झाले आहेत. शेजारी

कोण राहते याची चौकशी करणे अशिष्टपणाचे मानले जाते. आता दुपारी स्त्री-पार्लमेंटे भरत नाहीत. सामुदायिक वाचने नाहीत. आता दोन्ही शेजारणी महिला मंडळात जातात, क्लबात जातात. सारे जीवन पाहता पाहता बदलत आहे,– बदलले आहे, व त्याची जाणीवही फार थोड्यांना आहे. युग केव्हा बदलले ? याचा निश्चित क्षण कुणी सांगू शकत नाही. घरबांधणीची शैली केव्हा बदलली ? कुणी सांगू शकत नाही. गोल कौले गेली, पत्रे आले. आता कॉंक्रीटचे ' टेरेस ' झाले. ओटी, माजघर, बाळंतिणीची खोली, विटाळशीची खोली– या गोष्टी आता स्थापत्याच्या व वास्तुशिल्पाच्या इतिहासात जमा आहेत. आता मातृमंदिरे निघाली, दवाखाने निघाले. सारे काही बदलत आहे; आणि जर शंभर वर्षांपूर्वीचाच काय पण ५० वर्षांपूर्वीचा मृत गृहस्थ आज पुण्यामध्ये येऊन पाहील तर सर्व काही बदलले आहे असे त्याला वाटेल.

वस्तू बदलल्या, त्यांचे स्वरूप व उपयोग बदलले. व्यक्ती शरीराने बदलल्या नाहीत. नाक, डोळे, कान हे अवयव पूर्वीचेच आहेत. कान लांबले असतील पण देहिक नव्हेत, विचारांचे. डोके तिरकस झाले आहे,– देहिक तसेच खांद्यावर आहे; तसेच खालच्यापुढे ताठ, वरच्यापुढे नमलेले. तथापि त्यातील मनुष्य, त्याचा स्वभाव बदलला आहे. व्यक्ती-व्यक्तीतील नाती क्रान्तिकारक रीतीने बदलली आहेत. मालक–मजूर आता कराराच्या व्याकरणात बोलतात. मित्र–मित्र नव्या सामाजिक संदर्भात बोलतात. शेजारधर्म आता आमूलाग्र बदलला आहे. आराधना व वेदघोष ही आता घरोघरी क्वचित होतात. वसंतपूजा नाटकात पहायला मिळते. गुरु-शिष्य आता जोडीने ' लकी 'मध्ये जातात व परीक्षेतील यशाचा सौदा करतात. विद्या ही आता तकलुपी झाली आहे,– आणि आधुनिक स्त्री ज्याप्रमाणे घरी एक स्वरूपाची व बाहेर दुसऱ्या स्वरूपाची, त्याप्रमाणे आधुनिक विद्वत्ता पदवीच्या प्रसाधनाने भाव घेत आहे. वैवाहिक नाती आता कर्तव्याच्या नजरबंदीतून मुक्त होऊन सोयीच्या उद्यानात वावरत आहेत. आता कुणी वधू व वरांची विशेष माहिती घेत नाहीत. कुठल्या कुळातील याचा विचार क्वचित. मनूने सांगितलेला चातुर्वर्ण्य आर्थिक परिस्थितीने कानसून टाकला

आहे. पिढीजात व परंपरागत धंदे आता तसे राहिले नाहीत. मेलेली जनावरे आता स्वाभिमानी हरिजन ओढून नेत नाहीत. तिरकी पगडी व मिशावर पीळ देणारा पाटील आता ते काम करू लागला आहे. आगरकरांनी चोळीऐवजी जाकीट घालावे व पायात चपला घालाव्यात एवढाच माफक उपदेश केला. आता चोळी तर गेलीच व जाकिटाच्या बाह्या पण गेल्या. आणि जोड्याऐवजी उंच टाचांच्या चपला घालून स्त्रिया पुरुषांएवढी आपली उंची आहे हे दाखवीत आहेत.

सर्वत्र समाजामध्ये स्थितिभाव नाहीसा होऊन स्पर्धाभाव सुरू झाला आहे; आणि या वातावरणात जातीच्या तटबंदीबाहेर पडून अनेक स्त्री व पुरुष विवाहबद्ध होत आहेत ही वस्तुस्थिती आज समाजात दिसत आहे. तथापि ती सर्वांना व सर्वस्वी ग्राह्य आहे असे नाही. आणि समाजातील अनेक थरांतून हिंडत असताना, अनुभव वेचीत असताना काही विलक्षण घटना दिसून येतात.

अशाच एका मे महिन्याच्या संध्याकाळच्या वेळेस डेक्कन जिमखान्यावरील मंगल कार्यालयात लग्नासाठी जावयाचे होते, आणि घाईघाईने अप्पा-बळवंत चौकापर्यंत आलो तोच एका तरुण रिक्षावाल्याने ' काकासाहेब, रिक्षा हवी का ? ' असे विचारले. आणि मग या आदराच्या संबोधनाने आकर्षित झालेला मी काही न ठरवता बसलो. आणि त्या माझ्या सारथ्याने कथा सांगण्यास सुरुवात केली. त्यात असे आढळून आले की, तो ४२ च्या चळवळीत होता, आणि कारागृहात पण होता. आणि जुन्या सत्याग्रहींना कुणी विचारीत नाही ही तक्रार त्याने माझ्या कानावर घातली. आपण कोठेही सरकारी नोकरीचा प्रयत्न केला नाही हाही एक स्वाभिमानाचा भाग त्याने सांगितला. गेली ७ वर्षे रिक्षा हाकत असतो व नेकीने व्यवहार करीत असतो. मी म्हणालो, ' तुम्ही रिक्षावाले भयंकर जोरानं रिक्षा हाकता ! ' आणि मग त्याने मला एका तासात किती जोराने व किती ठिकाणी रिक्षा हाकली याचे उदाहरण दिले.

तो म्हणू लागला,– सकाळी १० च्या गाडीने एक हिंदू तरुण व बॉबकट केलेली खिश्चन तरुणी उतरली आणि मजजवळ आली, आणि एका

तासात किती गोष्टी करावयाच्या याची यादी माझ्याजवळ दिली. त्यात त्या ख्रिश्चन मुलीला वकिलाकडे न्यावयाचे होते, तेथून हिंदू करावयाचे होते, तेथून रजिस्टर कचेरीत न्यावयाचे होते, व तेथून स्टेशनवर न्यावयाचे होते. त्या तरुणाने पाहिजे तितके पैसे देतो असे सांगितले. मी चाट झालो. ती मुलगी ख्रिश्चन होती हे त्यानेच सांगितले. आपण ब्राह्मण आहोत हेही त्याने सांगितले. तो उमदा तरुण होता, प्रामाणिक होता. त्याला काही लपवावयाचे नव्हते. तो म्हणाला की, माझे भाऊ विरुद्ध आहेत व ते म्हणतात कुळाला कलंक लावतो आहेस. म्हातारी आई सनातनी. पण सनातन धर्मातील श्रेष्ठ भावना करुणा असल्याने तिने काही कर, सुखी हो, हाच आशीर्वाद दिला. पुण्यातील वकिलांचा सल्ला घेतला व त्यांच्याच सल्ल्याप्रमाणे लग्न रजिस्टर करावयाचे ठरविले होते. त्याची पूर्वतयारी झाली होती. भावांपैकी एकाने सूचना केली की, तू मुलीला हिंदू कर, मग विवाह कर,– म्हणजे तितकेच बरे वाटेल. जसे काही कार्ल्याला बेगडाने गुंडाळले म्हणजे ते कडू राहणार नाही. अशीच ती सूचना होती. त्या ख्रिश्चन मुलीने ते मान्य केले. धर्मावर प्रेमाने विजय मिळविला. प्रेमभावना ही आधीची आहे, धर्म नंतर जन्मास आला. त्याने काही शिस्त आणली, ओबडधोबड व्यवहाराला पावित्र्य व मांगल्य आणले. ऐन धर्म मानवता धर्म आहे, व तो दिक्कालातीत आहे. माझ्या सारथ्याने आमच्या प्रवासात कथन चालवले होते. माझे मन त्यावर ताबडतोब टीका-टिप्पणी करीत होते. सनातन वृत्तीच्या भावाने परिस्थितीला जुळवून घेतले.

नापसंत विवाहामुळे आईबापांपासून निराळे झालेले तिसरी पिढी जन्मताच एकत्र येतात व नातवाला पाहतात. मुलाचे अगर मुलीचे तथाकथित धर्मबाह्य आचरण विसरून जातात आणि त्या नातवात श्रेष्ठ मानव्याची प्रतिमा पाहून त्यांचे वात्सल्य ओथंबून येते असा अनुभव असल्याने, मी त्या सारथ्याला म्हणालो की, ‘ काय बिघडलं ? मिया बिबी राजी तो क्या करेगा काजी ! ’ तो जरा नाराज झाला. माझ्याकडून तरी त्याने अशी अपेक्षा केली नव्हती. तो म्हणाला, ‘ आमच्या रजपुतांत तरी असं होणार नाही ! ’ मी म्हणालो, ‘थोड्या दिवसांत तुमच्यांतही असंच होईल ! ’ आणि

आमचे हे बोलणे होते तोपर्यंत सुवर्णस्मृती कार्यालयाजवळ आलो. ' काका, तुम्ही असं बोलता ! आता खरंच कलियुग आलं !'

मी म्हणालो, ' ते येणारच होतं. वाट चालत आहे. तू मी त्यांची दखल घेत नाही एवढंच.' तो तेथून दुसऱ्या भाड्यासाठी गेला. मी मंगल कार्यालयात आलो. सर्वत्र उत्साह दिसत होता. माझ्या मनात मात्र त्याची दुःखपूर्ण वाणी ' कलियुग आलं ' हीच ऐकू येत होती. आणि ' तुम्ही असं बोलता !' हा बाण मनाला चाटून गेला होता. पण पन्नास वर्षांच्या सार्वजनिक जीवनात, ' काका, तुम्ही असं बोलता ! ' हा आक्षेप अनेक वेळा घेतलेला आहे. आणि याचा अर्थ एवढाच,– अनेकजण मला समजू शकले नाहीत. आणि एवढ्या अर्थाने तरी कलियुग आले आहे !

* * *

# भीमेच्या प्रवाहासंगे

लोकजीवनात डोंगर, नद्या, खोरी– किंबहुना साऱ्या भौतिक सृष्टीला एक आगळे महत्त्व असते. भौतिक सृष्टीच्या संदर्भात अनेक गावांना व नगरांना नावे प्राप्त होतात. प्रवरा–संगम, गंगाखेडी, त्याचप्रमाणे आंध्र देशातही अशी गावे–नावे आढळून येतात. ‘ स्ट्रॅक्फर फॉर आव्हान ’ म्हणजे आव्हान काठचे स्ट्रॅक्फर. शेक्सपियरचे जन्मगाव ‘ फ्रँकफोर्ट ऑन मेन ’ म्हणजे मेन नदीवरील फ्रँकफोर्ट. आणि या नावाचा अभिमान त्या त्या गावच्या लोकांना असतो. ‘ चंद्रभागेच्या तीरीं विटेवर उभा असलेला ’ या वर्णनात जे स्वारस्य आहे ते नुसत्या ‘ विटेवर उभ्या ’ असलेल्या शब्दांत नाही. कऱ्हाड नगरी म्हणून भागत नाही, कऱ्हाड–नगरी कृष्णा-तीरी असे म्हटले म्हणजे एक निराळा आनंद उत्पन्न होतो.

आणि पर्वताजवळ असलेल्या अगर दऱ्याखोऱ्यांत असलेल्या गावांना होणारा आनंद संकुचित असतो. कारण डोंगर हे अचल आहेत, खिंडी–खोरी याही अचल आहेत. तथापि लोकमाता अगर नद्या या प्रवाही असतात. आणि त्यामुळे अनेक गावांना त्या आनंद देत असतात. प्रसंगी संकटांतही लोटतात. तथापि, त्यांच्याशिवाय त्यांच्या काठावरील खेड्यांना व तेथील लोकांना करमत नाही. गगनचुंबी पर्वतशिखरांतून उगम पावून शेकडो मैल उनाडक्या करीत, नाचत–बागडत, अंतरानंतर प्रौढपणा मिरवीत मिरवीत तीरीच्या पादपांना व लोकांना समृद्ध करीत करीत सागर गाठत असतात. आणि त्याबद्दलचे स्वाभाविकच आकर्षण असते. आणि तसेच आकर्षण मला भीमेबद्दल आहे. जन्म जरी चंबळ नदीच्या आसपास झाला असला तरी

जाणिवेचे आयुष्य व आठवणीचे संवत्सर सुरू झाल्यापासून भीमा ही माझ्या मनाची अजूनही पकड घेऊन राहिली आहे. लहानपणी मातुलग्रामी म्हणजे सिद्धटेकां नदीवर पोहणे, घाटावरून उड्या मारणे, बरोबरीच्या मुला–मुलींची चेष्टा करणे, वडील व वृद्ध, स्त्रिया व पुरुष यांच्या प्रेमळ शिव्या खाणे, प्रसंगी त्यांनी आजीकडे केलेल्या तक्रारींना तोंड देणे,– या साऱ्या आठवणी भीमेच्या अखंड प्रवाहाप्रमाणे आजही माझ्या मनाच्या दुआबात वहात आहेत.

कुठे कुठे मी या भीमेचे कौतुक केले आहे. आणि जेथे जेथे पाहिले तिथे आनदाव्यतिरिक्त मला काही दिसले नाही. पुणे जिल्ह्यातील भीमाशंकराच्या डोंगरात जन्म घेऊन पित्याचे घर तिने अगदी त्वरेने सोडले. भीमाकुंडाच्या गोमुखीतून तिने दक्षिणेकडे प्रवास सुरू केला. आणि अल्लडपणे नाचत बागडत पहाडी मुलुखातून मैदानात ती उतरली. त्या पहिल्या दशेत तिच्या तीरी राहणाऱ्या वन्य जातीच्या स्त्री–पुरुषांचे मनोभाव तिच्या प्रवाहात उतरले, स्वभावात उतरले, आणि काही महिन्यांपूर्वी जेव्हा वाड्याला गेलो त्या वेळी त्या ठिकाणच्या घाटावर किती तरी वेळ तिच्या प्रवाहाकडे पहात होतो. तेथील वातावरण वन्य नव्हते पण रम्य होते. सुंदर घाट, सुंदर लुगड्याला चांगला शोभिवंत पदर असावा असा दिसत होता. ती सकाळची वेळ होती आणि अनेक कुमारिका व प्रमदा कडेवर अगर डोक्यावर तिच्या प्रवाहात घागर भरून घेऊन जीवनाचा मार्ग म्हणजे उंचावर असलेल्या वाडे ग्रामात जाताना दिसत होत्या. नैसर्गिक स्वास्थ्यामुळे एक आगळे सौंदर्य व भाव त्यांच्या मुखावर विलसत होता. प्रसाधनांच्या साधनांशिवाय त्यांचे सौन्दर्य उठून दिसत होते. आणि बांधेसूदपणा हा त्यांच्या शरीराचा गौरव होता. काही एक दोन वृद्ध ब्राह्मण उगवत्या सूर्याला अर्घ्य देत होते. हजारो वर्षांपूर्वी त्यांच्या पूर्वजांनी जो हा आचारप्रवाह सुरू केला होता तेच व्रत ते अखंडपणे पुढे चालवत होते. सृष्टीच्या जन्मापासून सुरू झालेला भीमामैय्याचा प्रवाह तसाच अखंड वाहात होता. उन्हाळ्यामध्ये आटोपशीर, पावसाळ्यात अफाट, हिवाळ्यात बेताबाताचा तथापि या लोकमातेचा अखंड असा प्रवाह चालूच आहे. हिच्या काठाची तट्टे अटकेपार गेली. हिच्या परिसरात जन्मलेली पंजाबच्या सुभेदार पदावर

गेली,– तथापि स्थितप्रज्ञाप्रमाणे ही अखंडपणे वाहातच आहे. किंबहुना ही कालाची भगिनी आहे, सहोदर आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती नाही. या बहिणभावात कोण अग्रज हे अनंतकालचे कोडे आहे. अजून ते कोणी सोडवले नाही,– आणि ते सोडवील अशी आशा नाही.

वाड्याच्या दक्षिणेस काही अंतरावर बिबी गावाजवळ भीमा पुन्हा डोंगराळ भागातून जाते. आणि तेथे आता धरण होणार आहे म्हणून माझ्या भेटीत मी तज्ज्ञाच्या दृष्टीने अज्ञ असून तिच्याकडे बघत होतो. तिला बंधन घातले तरी ती रागावत नाही. उलट स्फूर्तीची ‘ वीज ’ अगर ‘ विजेची स्फूर्ती ’ निर्माण करण्यास कारणीभूत होते. आणि खेड-ग्रामी तर तिला गेल्या साठ वर्षांत किती तरी वेळा पाहिले आहे. तेथे तिच्या काठी असलेल्या सत्पुरुषांच्या समाधीचे दर्शन घेतले आहे, आणि गेल्या साठ वर्षांत या खेडला तिने नगराचे वैभव प्राप्त करून दिले आहे. याच काय, पण तीरीच्या अनेक गावांचा कायाकल्प तिने पाहिला आहे.

माणसे खोटी साक्ष देतील,– लोकमाता नद्या सतत गर्जून खरीच साक्ष देत असतात. तुळापूर येथे पुण्यातील मुळा–मुठा या भगिनी एकत्र येऊन तिला मिळतात आणि तुळापूरजवळ देहू–आळंदीचा संदेश घेऊन येणारी, ज्ञान आणि भक्तीचा प्रसाद घेऊन येणारी इंद्रायणी तिच्या भेटीला येते, आणि त्याआधी रागावलेली भामा तिला मिठी मारून आपला राग विसरून जाते.

तुळापूर हे एक प्रकारे प्रयागच वाटते. दोन नद्यांमधील झाडी व उंच प्रदेश भयाण दिसतो. आणि याच भयाण प्रदेशाजवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील एक भयाण घटना घडली,– अशी दुःखद वार्ता त्या ठिकाणी गेलो असताना भीमामातेने सांगितली. फितुरीने पकडून आणलेल्या संभाजीला हालहाल करून दुष्ट आलमगीर औरंगजेब बादशहाने कसे मारले याची कहाणी ऐकली. मृत्यू की धर्म,– यांत निवड करताना मृत्यूचा स्वीकारकरून धर्मासाठी बलिदान करणारा महाराष्ट्राचा श्रेष्ठ पुत्र याच ठिकाणी चिरला गेला ! तुळापूरच्या दक्षिणेस काही मैलांवर भीमा कोरेगावला डावी घालते. तिच्या उजव्या काठाला हिंदू संस्कृतीच्या असमतेला– छळाला कंटाळलेल्या

महार जातीतील योद्धयांनी इंग्रजांची नोकरी करून मराठी राज्य खिळखिळे केले, नव्हे नेस्तनाबूत केले त्याचे प्रतीक म्हणून कोरेगावचा जयस्तंभ आहे. उथळ विचार करणाऱ्याला त्या योद्धयांचे कृत्य देशद्रोही वाटेल, पण विचारवंताला तसे वाटणार नाही. ' संदेशो यत्र जीव्यते ' असे योगवासिष्ठात सांगितले आहे. जी स्त्री विनयशील आहे, जो पुत्र आज्ञाधारक आहे त्यांनाच तसे म्हणवून घेण्याचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे ज्या देशात मला स्वाभिमानाने जगता येते तोच माझा देश, हाच त्या सुभाषिताचा अर्थ आहे. समाजातील मूल्ये काही असली तरी मानवी मूल्ये चिरंतन स्वरूपाची अशी असतातच. आणि धर्मशास्त्याप्रमाणे प्रचलित मूल्यांची त्यांच्याशी तुलना करून समाज प्रगतिपर आहे की नाही हे ठरवावयाचे असते. ज्या समाजात मनुष्याचा स्पर्श मनुष्याला पापमय वाटतो तो ' समाज ' या संज्ञेला पूर्णपणे पात्र नाही. कोरेगावचा जयस्तंभ इंग्रजांनी त्यांच्या जयासाठी मृत्युमुखी पडलेल्या अनेक महार–वीरांच्या स्मरणार्थ बांधला आहे; व त्या स्तंभावर त्यांची नावे कोरून त्यांना अजरामर केले आहे.

१९४८ साली काश्मीरच्या कटकटीत सबंध महार पलटण गारद झाली. पण त्याचा उल्लेख सरकारी दप्तरापलीकडे कोठेही झाला नाही,– जयस्तंभ तर लांबच राहिला !

तेथूनही भीमा पुढे वहात आहे,– जीवन जसे अखंड वहात आहे. " काल " आज जन्माला येतो, " आज " उद्यांच्या निर्मितीस कारणीभूत होतो. आणि त्याप्रमाणेच भीमेचा प्रवाह या महाराष्ट्रातील अंतःकरणवजा प्रदेशातून वहात होता. कोरेगावनंतर मांडवगण येथे घोडनदी पुणे जिल्ह्यातील उत्तरेच्या सर्व नद्यांचे पाणी घेऊन आषाढी-कार्तिकी पंढरपूरला ज्याप्रमाणे भक्तजन येतात त्याप्रमाणे मिळते. मांडवगण दुमाला हे अत्यंत रम्य गाव आहे. दोन नद्यांचा संगम मोठा अपूर्व दिसतो. आणि मग तेथून भीमा पुणे जिल्ह्याची सीमा राखत राखत नीरा--नरसिंगपूरपर्यंत जाते. तेथे नीरा पुणे जिल्ह्यातील पश्चिम भागातील नद्यांचे सारे पाणी भीमेला समर्पित करते. पण दौंड ते नीरा--नरसिंगपूरपर्यंत ती सिद्धटेकला सिद्धिविनायकास

प्रणाम करूनच पुढे जाते. सिद्धटेकचा घाट म्हणजे एक श्रेष्ठ शिल्पाचा नमुना आहे. आणि सिद्धटेकच्या गावचा इतिहास मोठा उद्‌बोधक आहे. नदीच्या काठच्या टेकडीवर हरिपंत तात्या फडके यांच्या वडिलांनी पुत्रप्राप्ती-साठी तपश्चर्या केली आणि सिद्धिविनायकाने दृष्टान्त दिला की, 'सदा विजयी असा रणशूर पुत्र तुला होईल!' आणि मराठ्यांच्या इतिहासात पराभव न झालेला एकमेव सेनापती म्हणजे हरिपंत तात्या फडके होते. सिद्धटेकचे जीवन भीमेच्या जीवनाशी अविभाज्य आहे. तिला पूर येऊन गेला म्हणजे मळईतली ज्वारी सुवर्णकान्तीची निघते. आणि या ग्रामी मी अनेक वेळा पुरातून भोपळ्यावरून, डब्यावरून, नावेतून इकडून तिकडे गेलो आहे. भीमेने मला अक्षरशः खेळविले आहे. तिचे गुणदोष क्षणभर माझ्यात उतरले आहेत असे म्हटले तर मी तिच्यावर अन्याय करीत नाही. तिची आठवण रावी तीरावर गेलो तेव्हाही होती. गंगामैया तर सुरसरिता! पण माझ्या जंत्रीत तिचा नंबर दुसरा लागतो.

येथेच, म्हणजे सिद्धटेक व नीरा–नरसिंगपूर या प्रदेशात, नीरा वहात आहे आणि याच परिसरात भोसल्यांचे मूळ गाव आहे. दादोजी कोंड-देवांचे मलठण, भोसल्यांचे खानविट ही खेडेगावे आता उद्‌ध्वस्त झालेली आहेत. दादोजी कोंडदेवांचा वाडा आता पडलेला आहे. दरवाजा तेवढा उभा आहे. पण तेथील दगड अन् दगड स्फूर्ती देत आहेत. 'फत्तरोंने गीत गाया' असे दृश्य आहे. नीरा–नरसिंगपूर येथे तर क्षेत्राचेच वाता-वरण झाले आहे. नीरा-भीमा यांचा संगम म्हणजे बारा मावळांतील दक्षता, पुणे भागातील चातुर्य, व जुन्नर–खेड भागातील विशालत्व यांचा संगमच होय. आणि तेथून भीमा पुढे सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करते.

आणि डिकसळजवळील भीमेच्या पुलाजवळच माझ्या आयुष्यातील एक ऐतिहासिक घटना घडली. या पुलाजवळच १९५२ साली एप्रिल २८ च्या ब्रह्ममुहूर्तावर गाडीत दोघा चोरांनी प्राणघातक हल्ला केला. आणि गळ्याला माझेच उपरणे बांधून गाडीबाहेर फेकण्याचा उद्योग करीत असता भीमा नदी आली म्हणून गाडीचा वेग कमी झाला. चोरांना वाटले गाडी थांबते आहे. आणि त्यांनी मला जीवन-मृत्यूच्या सीमेवर सोडून देऊन धावत्या गाडीतून पलायन केले. भीमेने माझे संरक्षण केले. भीमातीरीच्या

सुकन्येने मला जन्म दिला आणि त्याच प्रेमाने ते संरक्षण दिले, असे माझे हिंदी संस्कृतीत मुरलेले मन सांगत आहे. त्या घटनेनंतर जीवनाचा प्रवाह बदलला. जसा आता येथून पुणे जिल्ह्यातील वैभव सोडून सोलापूरच्या रूक्ष प्रदेशात भीमेचा प्रवाह बदलला; आणि तेथून अवघ्या काही मैलांच्या अंतरावर भूलोकचे वैकुंठ म्हणजे पंढरपूर आहे. " त्रैलोक्याचा राया अठ्ठावीस युगे विटेवरी उभा " आहे. त्याला भेटण्यासाठी भीमा मग झपाट्याने वाहते. आणि पंढरपूरच्या जवळ, किंचित लहानपणची आठवण होऊन जसे मंगळागौरीला प्रौढ स्त्रिया वागडतात त्याप्रमाणे ती थोडे वळण घेते, व लागलीच तिला पंढरपूरच्या उत्पातांनी, बडव्यांनी, अभंगांनी आणि डिंगऱ्यांनी चंद्रभागा नाव देऊन आपल्या कमाईला ' चाहूर ' उत्पन्न केले. मी कधीही चंद्रभागेच्या तीरी ' उभा हा विठ्ठल ' असे म्हणालो नाही. भीमातीरीच म्हणत आलो आहे. अनेक जणांनी स्वाभाविक घडणाऱ्या गोष्टीला आपल्या खाती जमा करून स्वार्थाचा बाजार केला आहे त्यातलाच हा प्रकार आहे. तीर्थातीर्थांतून हे घडून येत आहे. आणि अज्ञानी जनामध्ये बुद्धिभेद करावयाचा नाही या औदार्यवृत्तीचा फायदा आज अनेक घेत आहेत. ' भीमेच्या तीरी विठ्ठल ' की ' विठ्ठलाजवळ भीमा ' हे अनंतकालाचे कोडे आहे. भक्तीजवळ देव, भावाजवळ देव, का देवाजवळ भाव, हे कोडे वेदकालीन ऋषींपासून अलीकडील तत्त्वज्ञांपर्यंत कुणाला सुटले नाही. एवढे मात्र माहीत आहे की, ज्या ठिकाणी भक्त गातात तेथे देव राहतात, हा पत्ता बिनचूक माहीत झाला आहे. तात्पर्य, भगवंतामुळे भक्त का भक्तांमुळे भगवंत, याचा वाद संतांनी पण घातला आहे. ' अरे विठ्या, आम्ही नसलो तर तुला कोण विचारणार ? ' असा प्रेमळ पण मार्मिक प्रश्न एका महाराष्ट्रीय संताने केला आहे. बैठकीत रसिक नसले तर गायिका कावरीबावरी होते. ' अगर हम न होंगे तो ले जाओगी किससे ! ' हे एका रसिक शायराचे शब्द एका अनंतकाळचे सत्य सांगणारे आहेत. विठ्ठल अठ्ठावीस युगे उभा आहे तर भीमा पण अठ्ठावीस युगे वहात आहे.

पंढरपूर सोडताच पुन्हा ती पूर्वकल्पित दिशेकडे जाते, आणि संथपणे तिचा प्रवाह सोलापूरच्या रूक्ष प्रदेशाला उल्हसित करीत करीत सोलापूर जिल्ह्यातून कन्नड मुलुखात जातो. आणि कानडी लोक विठ्ठल आमचा

म्हणत आहेत तो त्यांना कधीच मिळणार नाही, म्हणून त्याच्या चरणांनी पुनीत झालेले जल कानडी मुलखांना भीमा देत देत रायपूर दुआबात जाते. रस्त्यात ती विशाल होत जाते, पण थोडी उथळ होते. मला वाटते, कानडी प्रदेशाचा गुण कदाचित तिला लागला असावा ! क्षेत्र गाणगापूर येथे मी तिची भेट घेतली. तिच्या प्रवाहात लौकिकपदाचा विचार बाजूला ठेवून ज्या मस्तीने, ज्या धुंदीने सिद्धटेकच्या घाटावर डुंबलो, त्याच मस्तीने व त्याच धुंदीने गाणगापूरच्या घाटाजवळील भीमाप्रवाहात डुंबलो. तेथील देवस्थान पाहिले. मूर्ती व पादुका पाहिल्या. नव्याने निर्माण होणारे मंदिर पाहिले. पण भीमेने ज्याप्रमाणे तेथे न थांबता पुढे प्रयाण केले त्याच वृत्तीने माझ्या जीवनप्रवाहात आलेल्या मूर्ती व पादुका यांना वंदून डावी घालून पुढे गेलो. ही शिकवण भीमामैय्याने मला दिली आहे.

काही मैलांच्या अंतरावर मग भीमा गाणगापूरला सोडून कृष्णेला मिळत आहे. गाणगापूरला त्या प्रदेशातील सारी भूते तिच्या प्रवाहात सद्गती घेतात आणि अशा साऱ्यांना पावन करीत करीत ती कृष्णेच्या व्यापक जीवनात स्वतःला समर्पण करते. तेथून तिचा असा प्रवाह राहिलेला नाही. आणि अगदी तसेच व्यक्तीच्या जीवनात होत असते. प्रज्ञा स्थिर झाली, स्थित झाली म्हणजे समाजाच्या व्यापक जीवनात आपले जीवन समर्पित करीत असतो. व्यक्तिगत जीवन संपत असते. चिरकालचे जीवन मग स्थिर होते. ते अथांग होते, अमाप होते, आणि जे काही उरते ते अन्यांसाठी उरते. ' तुका म्हणे आता। उरलो परोपकाराकरिता।' हेच खरे. त्यांच्या जीवनाची इंद्रायणी चंद्रभागेत विलीन झाली आणि भीमा तिच्यासह कृष्णेत आणि वडलोपार्जित वतन असलेली कृष्णा अनंत मुखांनी सहभागिनींकडून घेतलेले अमृतजल घेऊन सागराला मिळते व स्वतःला समर्पित करून व्यक्तिगत भाव समाप्त करते. आणि जेव्हा मी १९५८ साली नागार्जुन–सागरचा प्रकल्प पाहण्यास गेलो आणि तेथील कृष्णेच्या प्रवाहात पापप्रक्षालन केले त्या वेळी अनंत विचार माझ्या मनात आले. त्यांतील थोडे आज वाचकांना वानगीदाखल देत आहे, आणि भीमामैय्याचे ऋण याप्रमाणे फेडीत आहे.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम ४९००१ ...... वि: निबंध
क्रमांक ....९०४२..... नों. दि. ५।२।६०

# अभी तक उस्ताद नहीं मिला !

आयुष्यामध्ये ज्ञानप्राप्ती करावयाची असेल तर, व प्रभावी ज्ञानप्राप्ती करावयाची असेल तर, पुस्तकालयात बसून ती होत नाही, कोठे तरी रानावनात जाऊन ती होत नाही.

रानावनात जाऊन चिंतन करावयाचे असते, मनन करावयाचे असते. कमावलेल्या ज्ञानाची व अनुभवाची वर्गवारी करावयाची असते. दागिने पेटीत असले म्हणजे त्यांना किंमत नाही व ते भूषणही नसतात. ते भूषण ठरावयाचे तर अंगावर घातले पाहिजेत व 'मिरविले' पाहिजेत. ज्ञान तसेच निर्विकल्प आहे. जेव्हा ते निर्विकल्प होते तेव्हा ते ज्ञातावतय यापासून अलिप्त काढता येत नाही. आणि निर्विकल्प ते नसल्याने परिस्थितिसापेक्ष समाजात ते अनुभवातून वेचावे लागते.

शब्दाने ज्ञान होते पण ज्ञेय पूर्वी असावे लागते. आंबा या शब्दाने असलेल्या आंब्याचा बोध होतो. शब्दाने आंबा निर्माण झाला नाही. आंबा होता तो शब्दाने मानवी मनामध्ये काही संकेत उत्पन्न करिता झाला. शब्दाने वस्तूचे वैशिष्ट्य, व्यक्तीचे व्यक्तित्व निर्धारित होते. ती वस्तू कोणत्या कुळातली, कोणत्या गणगोताची याचे ज्ञान होते. तीच गोष्ट व्यक्तींच्या बाबतीत आहे. व्यक्तीचे व्यक्तित्व अनुभवात आल्यानंतर त्याचे गुण शब्दात अवतार घेतात; पण मुळात ते असतात. म्हणून शब्दापूर्वी अर्थ, ज्ञानापूर्वी अनुभव हा क्रम उघड आहे. आणि म्हणून ज्ञानप्राप्तीसाठी अनुभव हवा, आणि अनुभव तेच ते पाहून, तेच ते निरखून, त्याच परिस्थितीशी

तीच प्रतिक्रिया देऊन वाढत नाही. रोह व अवरोह कमीजास्त केल्याने राग बिघडत नाही. म्हणून जीवनाची नवी नवी क्षितिजे पहावी, शोधावी. रामदासांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे,

' पहावा प्रान्त नित्य नूतन, भिक्षामिषे जावे जन शोधावे, त्यांची अंतर्यामी निरीक्षावी । '

देशाटन केल्याने पंडितमैत्री होईल का नाही, सांगता येत नाही; सभेत संचार होईल की नाही, सांगता येत नाही; पण विलोकनाने जीवनाच्या पडशीत अनुभवाचे कण साचत असतात.

आणि गेल्या पन्नास वर्षांत, म्हणजे सामान्यपणे व्यवहारातील शहाणपण आल्यापासून– निदान मला ते आले आहे असे वाटल्यापासून– प्रवासाइतकी गोडी दुसऱ्या कशातसुद्धा मी दाखविली नाही. तुरुंगातील अनिवार्य संथपणा सोडला तर असा आठवडा जात नाही की मी कोठे गेलो नाही. (कोणी माझ्या ' विद्वत्ते 'चा सत्कार करण्यासाठी बोलावतात. कोणाला माझे ' मार्गदर्शन ' हवे असते. कुणाला माझी ' मते ' समजून घ्यावयाची असतात. तात्पर्य, मला सारे निमित्त पुरे होते. आणि हळूच सांगतो–प्रत्यक्ष राजकारणात असताना निमित्तांची निर्मिती मी करीत असे.)

गेल्या मार्च महिन्यात एरंडोलला एका शिक्षणसंस्थेच्या हीरकमहोत्सवासाठी जावयाचे होते. त्याच्या आधी आंबेजोगाईला पण जावयाचे कबूल केले होते. आणि त्याच वेळी बार्शीलाही एका शिक्षण-संस्थेच्या समारंभासाठी जाण्याचे कबूल केले होते. आणि जो कार्यक्रम आखला होता, त्यात मनुष्याला बांधून टाकावे त्याप्रमाणे मी काळाला बांधून टाकले होते. ठरलेल्या कार्यक्रमाप्रमाणे एरंडोल, जळगाव या दोन ठिकाणी व्याख्यानबाजी करून मी मनमाडला रात्री पोहोचलो होतो. त्या दिवशी सकाळी जळगावच्या कॉलेजमधील साहित्यविषयक व्याख्यानात रंगलो होतो, आणि दिवसाचा आढावा घेताना मन प्रसन्न झाले होते.

औरंगाबादला उतरून तेथून गाडीने जवळजवळ दीडशे मैल आंबेजोगाईला जायचे होते. गेल्या पन्नास वर्षांत असा अनुभव आहे की, प्रवासात

असलो म्हणजे व विशेषतः ग्रामीण भागात हिंडत असलो म्हणजे, मन अधिक प्रसन्न होते; आणि माझे विदेही अस्तित्व निसर्गाशी सायुज्यता पावते. त्याचप्रमाणे खेडेगावातील भ्रूविलासानभिज्ञा स्त्रियांशी बोलताना व दंभविरहित पुरुषांशी बोलताना माझे मन स्वतःशीच अधिक रमते आणि मग अनेक चांभारचौकशा मी करीत असतो.

औरंगाबादला ६॥ ला पोहोचलो. नंतर एका पत्रकाराकडे चहा घेऊन, आंघोळ करून, आंबेजोगाईच्या रस्त्याला आमची गाडी निघाली. तो सारा परिसर महाराष्ट्रीय संतांची जन्मभूमी असल्याने पवित्र मानला जातो. मराठी संस्कृतीचे ते माहेरघर आहे. तेथील मराठी भाषेचा गोडवा अवीट आहे. भोळी-भाबडी, प्रेमळ अशी ती मराठी भाषा आहे. मुंबईतील भाषेसारखी प्रसाधनपूर्ण ती नाही. पुण्यातील भाषेप्रमाणे तिचा पदर खांद्यावर आलेला नाही. मला ती मराठवाड्यातली मराठी भाषा नेहमीच आकर्षित करीत आली आहे.

बरोबरचे भाऊसाहेब परांजपे हे अनेक कथा, अनेक आठवणी सांगत होते आणि आमचा प्रवास मनाने व मोटरीने तीव्र गतीने होत होता. प्रदेशातील रस्ते सामान्यपणे, निदान मुख्य मुख्य बरे होते, आणि विशेष हाडे सैल न होता आम्ही गेवराईच्या शिवारात आलो.

मोटर-स्टँडजवळ गाडी थांबली. मोटर-स्टँडचा परिसर म्हणजे बातम्यांच्या देवघेवीचे एक केन्द्र. साऱ्या जगातील राजकारण चर्चिले जाते. प्रसंगी कानाशी लागून, प्रसंगी कानठळ्या बसतील एवढ्या आवाजाने. रस्ते ही माणसांची व मालाची वाहतूक करतात; एवढेच नव्हे तर ज्ञानाचा व अन्य अनंत अलौकिक गोष्टींची पण वाहतूक करतात.

सहा सहा महिन्यांनी हरकारा येईल व बातमी देईल— हे युग संपले. आठवड्याचे पोस्ट-ऑफिस हेही संपले. आता दैनिक सांज-सकाळ निघणारी वर्तमानपत्रे मानवजातीला जगात काय चालले आहे याची माहिती देत असतात, त्याला खवडवीत असतात ! खूष करीत असतात, प्रशान्त करीत असतात.

भारतात लोकशाही आल्याने प्रत्येक वयात आलेला मनुष्य– जो वेडा नाही, नादान नाही, तुरुंगात नाही– तो मतदार झाला आहे. भारतभाग्य-विधाता झाला आहे. भारताचे प्रभुत्व याचा मालक झाला आहे. त्याच्यात देशमुखीची तक्षीम पैच्या एक हजारांश असेल, परंतु देशमुख आहे. एक भागिले २२ कोटी एवढी त्याची देशमुखी आहे. राज्य त्याच्या मताप्रमाणे व मर्जीप्रमाणे चालले पाहिजे, हा लोकशाही सिद्धान्त प्रस्थापित झाला आहे. तो एक यःकश्चित मनुष्य म्हणून त्याची उपेक्षा, त्याची वंचना होता कामा नये, अशी त्याची इच्छा असते. त्याच्या व्यक्तिविकासासाठी भाषण-स्वातंत्र्य, संघस्वातंत्र्य, संचारस्वातंत्र्य, मुद्रण-स्वातंत्र्य हे त्याला हवे असते आणि ते घटनेने त्याला योग्य मर्यादेत दिले आहे. काय खावे, काय प्यावे ह्याचे स्वातंत्र्य त्याला असले पाहिजे असा उपसिद्धान्त अलीकडे काढला जात आहे.

राज्य जर नागरिकांचा पालक आहे, त्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत त्याची सोय व सर्व व्यवस्था पाहण्याचे कार्य त्याला करावयाचे आहे, तर राज्याला काही निर्भेळ अधिकार असले पाहिजेत व व्यक्तीच्या वर्तनावर पण काही मर्यादा असल्या पाहिजेत. नदीला काठ आहेत म्हणून तिचा प्रवाह तक्रार करीत नाही. रस्त्याला कडा आहेत म्हणून वाहतुकवाले तक्रार करीत नाहीत. पण ईश्वराने जे निर्माण केले असेल त्याला अगर त्याच्या उपभोगाला मर्यादा असता कामा नये असे अनेक आधुनिक डाव मांडत आहेत.

त्या भागात द्राक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात होती, हे मोटर-स्टँडवर येताच लक्षात आले. आम्ही आमच्या मोटरीतून खाली उतरताच बरीच मंडळी आमच्या गाडीजवळ आली. माझ्यासाठी नव्हे; भाऊसाहेब परांजप्यांसाठी. ते त्या भागात नाणावलेले कार्यकर्ते आहेत. त्यांच्या अंतःकरणाच्या तळमळीचा अनुभव त्या प्रदेशाला आहे.

नेहमीच्या पद्धतीप्रमाणे बऱ्याच गोष्टी जमलेल्या लोकांना विचारल्या. अन्नधान्याबद्दल विचारले. एक म्हणाला, ‘ जगच नकटं झालं आहे. आमचे गाव त्यातून कसं सुटेल ? ’ बोलणारा वृद्ध होता. डोक्यावर मुंडासे होते.

हातात काठी होती. परंपरागत व प्रस्थापित प्रतिमा अशी शेतकऱ्याची ती व्यक्ती होती.

आता खेडेगावातून लेंगेवाले तरुण शेतकरी दिसून येतात. त्यांच्यात उत्साह असला तरी खानदानी प्रतिष्ठा आता त्यांच्या आचरणात दिसत नाही.

भूमीला क्षमा म्हणतात. ती शान्त असते. किती अत्याचार तिच्यावर केले तरी प्रत्युत्तर देत नाही. तेच वातावरण भूमिपुत्राच्या वागणुकीवर पसरलेले असते. त्यातील निर्भयता व अगतिकत्व दोन्हींचा अनुभव गेल्या पन्नास वर्षांच्या राजकीय जीवनात मी घेतला आहे. आणि स्वातंत्र्यानंतर सारा देश बदलत चालला आहे. त्याप्रमाणे त्यांची मानसिक सृष्टीही झपाट्याने बदलत आहे. आपण राज्याचे प्रभू ही जाणीव होत आहे. पण त्याचबरोबर ज्यांना आपण राजकीय जीवनाची बाग करण्यास दिली आहे, त्यांची दुष्कृत्ये पाहून ते अधिकच अगतिक झाले आहेत. एक सर्वसत्ताधिकारी वर्ग निर्माण झाला आहे, आणि सत्तेच्या जोरावर नवसंपत्तिमान ( New Rich ) वर्ग निर्माण झाला आहे. हा वर्ग गर्भश्रीमंत नाही. नीती व प्रयत्न यांच्यात काही संबंध असावेत असे त्यांच्या तत्त्वज्ञानात नाही. मिळेल त्या मार्गाने, मिळेल तेथून संपत्ती मिळवावी व ती मिळवताना आपल्या अगर आपल्या राजकीय पक्षाच्या सत्तेचा व प्रतिष्ठेचा उपयोग करावा असे सर्रास चालू आहे.

एका माजी काँग्रेसच्या अध्यक्षाने म्हटल्याप्रमाणे, ' कवडी नसलेले लक्षाधीश झाले आहेत. जे अनिकेतन होते, म्हणजे राहण्यास घर नव्हते, त्यांच्या ' कोठ्या ' झाल्या आहेत. सिनेमागृहे मालकीची झाली आहेत. पेट्रोल पंप त्याने हस्तगत केलेले आहेत. सत्तेची व संपत्तीच्या उत्पादनाची, निदान व्यापाराची केन्द्रे त्याने हस्तगत केली आहेत.'

मोठे जमीनदार क्षय पावत आहेत. लहान लहान जमीनदार सारे तुकडोजीराव होते तसेच आहेत. काही मध्यमवर्गीयांनी सहकारी तत्त्वाची साधना करून थोड्या लोकांत, विवक्षित गटात संपत्तीला बंदिस्त केले आहे.

देश पूर्वीसारखाच थोड्या श्रीमंत लोकांच्या हाती होता त्यापेक्षा तो काही अधिक थोड्यांच्या हाती आला आहे.

लक्ष्मी ही विष्णूची दासी, पण या कलियुगात ती दासी न राहता सत्तावान विष्णूवर अधिकार गाजवीत आहे. सृष्टीचा क्रम विकृत करून, विकृतीचे उत्पादन करून, त्यातून संपत्ती काढण्याचा प्रयत्न चालू आहे.

त्या पाच-दहा मिनिटांच्या मुक्कामात अनेक राजकीय व्यथा त्या भाबड्या ग्रामीण मंडळींनी आमच्यापुढे मांडल्या; आणि मग तेथे द्राक्षे विक्रीला आली होती, त्याकडे माझे लक्ष गेले. विक्री करणारी मुले शेतकऱ्यांचीच होती. दोघे-तिघे होती. प्रत्येकाजवळ टोपलीत द्राक्षे होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंस द्राक्षांचे मळे दिसत होते. आणि ती द्राक्षे आंबट आहेत असेही वाटत नव्हते. तथापि त्या मळ्यांकडे पाहून माझे राजकीय मन अनेक कारणांनी आंबट झाले होते. द्राक्षांपासून दारू काढून महाराष्ट्राला श्रीमंतांच्या दालनात नेऊन बसवावयाचे असा संकल्प महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी जाहीर केल्याचे वाचले होते.

काँग्रेस पक्ष अधिकारावर होता. त्या पक्षाची तुळशीमाळ घालून अशी निवेदने निघत होती. स्वातंत्र्याच्या चळवळीत दारूबंदी हे प्रयत्नांच्या भाल्याचे तीक्ष्ण पाते होते. १८४० च्या सुमारास लोकहितवादींनी लिहिले आहे की, स्वातंत्र्य प्राप्त झाल्याबरोबर पहिले सत्कार्य दारूबंदीचे केले जावे. सत्याग्रहाच्या चळवळीचे बीजारोपण १९०७ साली मद्यपान बंदीच्या चळवळीने झाले. वीस ते बावीसच्या सत्याग्रहात हजारो स्त्री व पुरुष दारू-बंदीनिमित्त केलेल्या निरोधनापायी तुरुंगात गेले होते. अनेक ठिकाणी गोळीबार झाले होते. आणि १९३७ साली जेव्हा प्रान्तिक स्वायत्तता आली, त्या वेळी त्या वेळच्या काँग्रेस मंत्रिमंडळाने दारूबंदीच्या कार्यक्रमाला सुरुवात केली.

मद्यप्राशन हे सर्व धर्मांना अमान्य आहे. पण आता काँग्रेसच्या धर्म-संहितेत मद्याला गंगाजलाची प्रतिष्ठा मिळाली आहे. इतकेच नव्हे तर, वर सांगितल्याप्रमाणे गुळाच्या मळीपासून व द्राक्षापासून दारू उत्पादन करण्याचे कारखाने काढण्यास परवानगी मिळणार आहे हेही वाचले होते.

सभ्यता व संस्कृती याचा अर्थ प्रकृतीला उन्नत करणारे असा मी मानतो. मजजवळ भाकरी आहे व ती मी खाल्ली, ही प्रकृती झाली. मजजवळ भाकरी आहे, माझ्यासमोर एक उपाशी उभा आहे; त्याला मी दिली– ही संस्कृती झाली. कारण मी त्याग करून अधिक गरजूचे समाधान केले आहे. एकाजवळ भाकरी आहे ती मी काढून घेऊन फेकून दिली व कुणाला तिचा उपयोग होऊ दिला नाही– ही विकृती आहे.

सृष्टीने द्राक्षे दिली सेवनासाठी; ती कुजवून व नासवून, म्हणजे तिला विकृत करून, त्यातून मद्य काढून, सभ्य व संस्कृत माणसाला विकृत करणे याला आता संस्कृतीचे कार्य मानले जात आहे. आता देवालयाचे उद्घाटन जेवढ्या समारंभाने होत नाही, तेवढ्या समारंभाने दारूच्या गुत्त्याचे होत आहे. आणि सरकारी अधिकारी पण त्याला हजर राहण्यास आपले कर्तव्य व प्रतिष्ठा मानत आहेत.

देशातील मद्यपानबंदीचा विषय डोक्यात घोळत होता. सभोवार द्राक्षांचे मळे होते. त्या लहान मुलांच्या हातांत द्राक्षाने भरलेल्या टोपल्या होत्या. आणि माझ्या मनात नाना तऱ्हेच्या विचारांची द्राक्षे लागली होती. मग मी सर्व संदर्भाला अनुसरून त्या मुलांना विचारले, ' या द्राक्षांपासून ' शराब ' काढण्याचे काम इकडे सुरू झाले का ? ' त्या तीन लहान मुलांत दोन हिंदू होती, एक मुसलमान होते. हिंदू मुलाने सांगितले, ' नाही. तसं काही झालं नाही. आम्हांला चांगले पैसे मिळतात.' मुसलमान मुलाने सांगितले की, 'गावात विचार चालू आहे. मालुमात ले रहे हैं । लेकिन अभी उस्ताद नहीं मिला । ' (माहिती घेत आहोत, पण अजून गुरू भेटला नाही.)

हा मुसलमान मुलगा तेरा चौदा वर्षांचा होता. दोन हिंदू मुले त्याच्यापेक्षा दोन वर्षांनी लहान दिसत होती. मुसलमान मुलगा उघड उघड चौकस दिसत होता. गावात काय चालले आहे याची त्याला माहिती असावी असे दिसत होते.

अभी उस्ताद नहीं मिला ! हे वाक्य ऐकताच माझ्या डोळ्यापुढे अनेकांची नावे व चारित्र्ये उभे राहिली. महाराष्ट्र काँग्रेसचे एक पदाधिकारी दारूबंदीबाबत वाद करीत असताना म्हणाले की, ' भारतामध्ये मद्य तयार करा-

वयाचं व परदेशांत धाडून परकीय चलन मिळवावयाच, यात आम्ही कुठे पाप करतो ?' मी म्हणालो, 'मद्यपान वाईट म्हणून गांधींनी सांगितलं. ते भारताबाहेर चांगलं आहे असं सांगितलं का ? आणि परराष्ट्रीय हुंडणावळ अशा तऱ्हेनं मिळविणं म्हणजे लोकांना पाप करावयास लावून पैसे मिळविणं असं नाही का होत ? भारतातील अनेक गोष्टी मग नीतीला सोडून बाहेर धाडा, तुम्हांला पैसा मिळेल. तुमच्यापुढं सत्य का सोय असा प्रश्न असताना तुम्ही सत्याला बाजूला सारत आहांत.'

त्यांनी मला उत्तर दिले नाही. त्यांच्यात व्यापारी धूर्तता होती. पैसा त्याला परमेश्वराच्या जागी झाला होता. तोच न्याय तो राष्ट्राला लावू पाहात होता. समृद्धीसाठी संस्कृतीची विक्री तो करण्यास तयार झाला होता. अधिक सोयीसाठी देहविक्री करणारी वृत्ती त्याची होती.–सत्ताधारी पक्षाची ती होती.

अन् क्षणभर मनात आले की, त्या व्यक्तीचे नाव उस्ताद म्हणून त्या मुसलमानाला सांगावे. पण तो त्यातला तज्ज्ञ नव्हता. भाडोत्री निष्ठेने दारू उत्पादनाची तरफदारी करत होता. त्याला उस्ताद म्हणजे, खरोखर मद्यपान करणारेच हवे होते. मद्यपान करणारे अधिकारी, मंत्री हवे होते हे उघड होते.

आणि, तशी योग्यता असलेली माणसे माझ्या डोळ्यापुढे पण आली. मग मी त्याला म्हणालो, 'मगर मैं उस्ताद बताऊँ तो तू भी पिअेंगा क्या ?'

आणि त्याने उत्तर दिले की, 'मैं तो दो रुपयेवाली लाल बोथली पिऊंगा। उस्ताद चाहिये, उस्ताद चाहिये, पैसे कैसे कमाना ये दिखानेके लिये।'

माझ्या मनात आले की, कोणाही आमदार–खासदाराचे नाव सांगावे. पण विचार केला, बिघडलेले असले तरी आपल्या कुळातले आहेत. त्यांनी सोयरसुतक सोडले असले, तरी माझ्या मनाने सोडले नव्हते. आणि म्हणून कोणाही उस्तादाचे नाव न सांगता 'उस्ताद नही मिला' ही त्याची मद्याइतकी आतुरता वाढविणारी घोषणा त्याच वातावरणात ठेवली,– तोच भाऊसाहेब परांजप्यांनी 'निघालं पाहिजे' असे म्हटल्यामुळे त्या मेळ्यातून बाहेर पडलो. क्षणभर मनात विचार आला की, जीवनात लक्षावधी लोकांना उस्ताद मिळाला नाही अशीच घोषणा करावी लागत आहे.

* * *

# चंद्रभागा— नव्हे भीमाच !

चंद्रभागा...नव्हे भीमाच ! ‘ जननी व जन्मभूमी स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ असतात ’ असे म्हणतात व मानतात. जन्मभूमीमध्ये ज्या वास्तूत जन्म असेल त्या वास्तूपासून ते ज्या देशात जन्म झाला असेल त्या देशापर्यंतचा समावेश होतो. सुभाषितकाराने जननी म्हणजे केवळ माता असे मानले आहे. मी त्यामध्ये पितृदेवताचाही समावेश करतो; आणि जन्मभूमीमध्ये जन्मगावच्या लोकमातांचा, दोन्ही प्रकारांत त्या नसतात म्हणून, समावेश करतो. स्त्री मुलांना जन्म देते; त्याचप्रमाणे लोकमाता म्हणजे नद्या साऱ्या प्रदेशातील, परिसरातील लोकांना जीवन देतात; आणि त्यामुळे त्यांच्याबद्दल प्रेम व आदर असणे अगदी साहजिक व स्वाभाविक असते. कोठल्याही गावच्या ओढ्याला अगर बारक्याशा नदीला गावचे लोक अभिमानाने गंगा म्हणत असतात. ‘ सुरसरिता ’ गंगेची उपमा तिला देत असतात. तिचे पाणी पुण्यजल मानतात. तिला पुण्यसलीला म्हणतात. वाईची मंडळी आंघोळीला जाताना ‘ गंगेवर जातो ’ असेच म्हणतात. तीच गोष्ट नाशिकची मंडळी करतात.

तथापि असल्या प्रौढ संज्ञेने काही स्वार्थ त्यातून काढण्याची त्यांची बुद्धी नसते. त्यांच्या कृतीचा अर्थ एवढाच की, जे आहे ते पवित्र मानून दुर्भिक्षावर व विफलतेवर विजय मिळवायचा असतो, आणि जे आहे त्यापेक्षा निराळे आहे हे दाखविण्याकडे, मानण्याकडे मनुष्यमात्राचा कल असतो.

गजबजलेल्या शहरातील कोंदट वाड्याला लोक ‘ याज्ञवल्क्य आश्रम ’

म्हणतील, दीड मजली घराला ' प्रासाद ' म्हणतील, तर राजवाड्यासमान असलेल्या वास्तूला ' पर्णकुटी ' म्हणतील. ह्यात मनुष्याचा ध्येयवाद जितका दिसून येतो तितकेच ढोंगही दिसून येते; आणि असाच काही प्रकार हुशार पंढरपूरनिवासी क्षेत्रस्थांनी केला आहे. अनेक ठिकाणी वळणे घेत गेलेली भीमा पंढरपूरच्या परिसरात थोडी वळणे घेऊन गेली, त्यात विशेष असे काही नव्हते. भीमा ही सृष्टीच्या उत्पत्तीपासून तशीच वाहात आहे, आणि ती वळली ती तिच्या स्वाभाविक अल्लड वृत्तीनेच. अलीकडील युवती सहज जाताना वाकडी तिकडी बोटे करून पदर चाळवतात, अगर केस शेपट्या-वजा करून हवेत मिरवतात. तीच वृत्ती भीमेने ठिकठिकाणी वळणे घेण्यात दिसून येते. सागर–संगमासाठी उत्सुक झालेली भीमा कालान्तराने तिच्या तीरावर पुंडलिकाच्या दमाला भिऊन विटेवर उभ्या राहिलेल्या त्रैलोक्या-धिपती विठ्ठलासाठी, त्याचे पादप्रक्षालन करण्यासाठी वळली, ह्या दाव्यात सत्य नसून प्रचार आहे. इतिहास नसून साहित्य आहे. प्रज्ञा नसून प्रतिभा आहे. आणि जेव्हा जेव्हा मी पंढरपूरला जातो तेव्हा तेव्हा पंढरपूरकरांचा मला राग येतो आणि तो इतका की, विठोबाचे दर्शन घेताना मी ' ह्या पंढर-पूरकरांना सद्बुद्धी दे ' अशीच प्रार्थना करीत असतो.

मला भीमेचे प्रेम आहे, कारण सिद्धटेकच्या परिसरातून जीवन समृद्ध करणारी ती लोकमाता आहे. तिच्या प्रवाहात माझे मातृदैवत अनेक वेळा डुंबले आहे. तिच्या जलपानाने तिचे विचार आकारित झाले असले पाहि-जेत. ह्या श्रद्धेने माझे प्रेम भीमेवर लहानपणापासून आहे. तीन लोकमाता मी मानल्या आहेत. चंबळ– जिच्या परिसरात मी जन्म पावलो, भीमा– जिच्या परिसरात माझी माता जन्म पावली, आणि कृष्णा– जिच्या परि-सरात पितृदेवता जन्मली. ह्या तीन नद्यांपुढे मी गंगेलाही कमी लेखले आहे. यमुनेला बाजूला सारले आहे. पंचनद देशातील साऱ्या नद्यांचे मी कौतुक केले आहे; आदर दाखवला आहे; पण त्यांच्यावर प्रेम केले नाही. आईचे ऋण व वडिलांचे ऋण हिंदू संस्कृतीप्रमाणे मी फेडले आहे.

हिंदू संस्कृतीप्रमाणे देवऋण, पितृऋण व ऋषिऋण ही तीन ऋणे फेडा-वयाची असतात. देवाचे ऋण मी यथाशक्ती धर्म करून फेडले आहे. पितृ-

ऋण प्रजेत भर घालून फेडले आहे. वंशाला विस्तरित केले आहे. ऋषिऋण काही समाजकार्य करून फेडले आहे. पण ह्या लोकमातांचे ऋण मात्र मनाप्रमाणे व योग्य प्रमाणात फेडले नाही. चंबळच्या बाबतीत तिच्या प्रवाहाला तीन ठिकाणी अडवून मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याला आवश्यक अशा विद्युत्शक्तीचे उत्पादन करण्याची योजना माझ्या थोड्या प्रयत्नाने कार्यान्वित झाली आहे. भारतात दानच नद्या अशा आहेत की, ज्या उत्तरगामिनी आहेत आणि त्यामुळेच कदाचित् असेल, माझ्या जीवनाचा प्रवाह सामान्यपणे उत्तर दिशाभिमुख झाला आहे. आजपर्यंत तरी कृष्णा नदीच्या बाबतीत वडिलोपार्जित वाई येथील मठाची दुरुस्ती करून तिचे थोडे ऋण फेडले आहे. पूर्वजांनी मठ ब्रह्मचाऱ्यासाठी बांधला व त्याची दुरुस्ती माझ्यासारख्या संसारी माणसाने केली आहे. कृष्णेचे पाणी व त्याचा उपयोग महाराष्ट्राला व्हावा यासाठी मी भक्तिभावाने प्रयत्न चालवला आहे. आंध्रातील आर्यांच्या पुढे महाराष्ट्र राज्याचे होयबा केव्हा माघार घेतील ह्याचा भरंवसा जनतेला वाटत नाही. म्हणून मी अखंड जागृत आहे आणि ते ऋण फेडण्याचा प्रयत्न करीत आहे.

पण लोकमाता भीमा हिचे काही अजून ऋण फेडले नाही. भीमाशंकर तिचे जन्मस्थान. गेली ५० वर्षे तेथे जाणार असे मी म्हणत आहे, पण अजून गेलो नाही. बारा ज्योतिर्लिंगांपैकी दूरदूरची पाहिली; पण जवळचे पाहिले नाही. तिचे पाणी खेड तालुक्यातील निनवी गावाजवळ आडवावे व खेड-शिरूर वगैरे भागांना समृद्ध करावे. ह्याची खटपट अजून यशस्वी झाली नाही. तथापि ह्या लोकमातेचे ऋण साहित्यक्षेत्रात फेडण्याचा प्रयत्न करीत आहे. ज्या सिद्धटेकास तिने पवित्र केले तेथील सिद्धीविनायकाचे पादप्रक्षालन करून नंतर ती पंढरपूराकडे गेली. त्या सिद्धटेकाची कथा अनेक पैलूंनी साहित्यात मी चित्रित केली आहे. किंबहुना आतापर्यंत पंधरावर कथा झाल्या, आणखी काही लिहून “ वाहतो ही दुर्वांची जुडी ” असा थोडासा विक्रम मी करणार आहे.

आज कित्येक वर्षे पंढरपूरकरांनी तिला चंद्रभागा म्हणून जो अपमान केला आहे, त्याचा अहिंसात्मक बदला घेण्याचे ह्या लेखात ठरविले आहे.

पंजाबमध्ये चिनाब म्हणून जी नदी आहे, ती रोहटक पर्वताच्या पलिकडील डोंगरातून वाहणाऱ्या चंद्रा व भागा ह्या दोन्हींच्या संगमातून निघाली आहे, अशी कथा आहे. या दोन्हींची नावे एका नावात आणण्याचा प्रयत्न तेथील जमातीने करून चिनाब हे नाव प्रसृत केले आहे. त्या प्रदेशातील असंस्कृत व अडाणी लोकांनी संलग्न व संयुक्त संज्ञा निर्माण करून जो आदर्श दाखविला, जी रसिकता व शालीनता दाखवली तेवढी भूलोकीच्या वैकुंठातील पंढरपूरकरांनी दाखविली नाही. नुसत्या विठ्ठलाचे नाव घेऊन भागणार नाही. नुसत्या पंढरपुराचं महत्त्व विठ्ठलाच्या उपस्थितीने वाटणार नाही, हे जाणून वाणिज्य वृत्तीने समस्त पंढरपूर ग्रामस्थांनी लीलेने सहज वळण घेतलेल्या भीमेला चंद्रभागा करून टाकले.

सहज अंगणामध्ये गाय यावी व तिला गोठ्यात घालावी, असला हा विक्रम आहे. तसं म्हटले तर, ही भीमाशंकर पर्वतात जन्म घेतलेली भीमा तिच्या दोन्ही तीरांच्या लोकांना आपलीच वाटते. त्याची आपुलकी स्वाभाविक व प्रेमळ असते. पण त्यातून त्यांना स्फूर्ती व संतोष हवा असतो. पंढरपूरकरांना तसली आपुलकी, निष्काम आपुलकी दाखविता आली असती, पण ते पडले क्षेत्रस्थ ! कपाळाला काळा बुक्का लावून यात्रेकरूंचे भाग्य उज्ज्वल करण्याचा त्यांचा धंदा.

भीमेला भीमा म्हटले असते तर जो स्वार्थ साधत आहे तो साधला नसता. भीमा शालिनी आहे, समर्थ आहे, नम्र आहे, उद्भट आहे पण स्वार्थी कधीच नाही व कोठेही नाही, आणि अशा निःस्वार्थी व्यक्तीला अगर वस्तूला आज भांडवल मानून त्यावर व्यापार करणारे जीवनाच्या साऱ्या क्षेत्रात दिसून येतात. निःस्वार्थी गांधी अनेकांच्या स्वार्थाचे गोमुख ठरले आहेत. संसाराचा त्याग केलेले समर्थ अनेकांना आज अर्घ्यप्रदान करीत आहेत. आणि मीदेखील भीमेवरती लेख लिहून पैसा नाही तरी प्रतिष्ठेची अपेक्षा करतोच ना ? मग पंढरपूरकरांनी काय केले ? तथापि, स्वार्थास्वार्थात भेद असतो. सुसंस्कृत स्वार्थ सद्गुण ठरतो, निदान तारतम्यपणाची पदवी मिळवितो, तसा स्वार्थ पंढरपूरकरांचा नाही. भीमेला दत्तक घेऊन चंद्रभागा नाव ठेवले असते तर ते कायम पुढे राहिले असते आणि मग पंढरपूरचे

वैशिष्ट्य नाहीसे झाले असते. पुढील सर्व गावे पंढरपुराइतकीच क्षेत्रे झाली असती.

चंद्रभागा नाव आपल्या परिसरापुरतेच मर्यादित ठेवण्यात पंढरपूरकरांचा स्वार्थ किती कोंदट आहे, किती संकुचित आहे; ह्याला उपमा द्यावयाची झाली तर पंढरपूरच्या गल्ल्यांचीच द्यावी लागेल. म्हणून पंढरपूरकरांवर मी कायम चिडलेला आहे आणि त्याचबरोबर पंढरपूरपदस्थ श्रीविठ्ठलावर कायमचा आकर्षित झालों आहे. आणि पंढरपूरकर जर ‘ चंद्रभागेच्या तीरी झेंडा रोविला ’ असे म्हणण्याऐवजी ‘ भीमातीरी झेंडा लाविला ’ असे म्हणतील तर माझ्याजवळ जे काही आहे ते सर्व त्यांना देईन. आईचे पांग फेडण्याचे पुण्य मला लाभेल. गेली कित्येक वर्षे हा माझ्या मनातील भाव मी मनातच ठेवला होता; पण आता तो उघड सांगत आहे. कारण ते सांगण्याची योग्य वेळ हीच आहे असे मी समजतो. येथपर्यंत मी तेथील वाळवंटात जाई व दर वेळेला हा विचार उसळून वर येई. आता तो सांगत आहे. कारण आता माहेरची ओढ लागली आहे. आणि साहित्य संसाराची निरवानिरव करीत आहे. आशा वाटते की, पंढरपूरच्या जनतेने जरी भीमेला न्याय दिला नाही तरी महाराष्ट्राची जनता खास देईल, आणि म्हणेल की,– पंढरपुरी चंद्रभागा नव्हे, भीमाच आहे !

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ४९००९ वि. निबंध
क्रमांक ९८५२ नोंद दि. ५/३/

# एकही गोड क्षण यांनी ठेवला नाही

सामान्यपणे चांभाराचे लक्ष रस्त्यातून चालणाऱ्या लोकांच्या जोड्यांकडे असते. ह्यात त्याची दृष्टी केवळ स्वार्थी, व्यावसायिकच असते असे नाही; सेवाभावाचीही असू शकते. तसेच काहीसे राजकारणी माणसाचे असते. कसले का वर्तमानपत्र असेना समोर दिसले की राजकारणात वावरणारा ते हातात घेतो, आणि सामान्यपणे आपल्या दृष्टीने वाचीत असला तरी, राष्ट्राचे हित अगर सेवा त्याच्या मनाच्या स्वार्थाच्या बाजारात कुठे तरी वावरत असताना दिसून येते ! त्याला विचारले तर तोही आपल्या मनात अन्य काही विचार नाहीत, असूच शकत नाहीत, असा दावा मांडीत असतो.

प्रसंगाप्रसंगाने वर्तमानपत्रामाणेच कुठे चार माणसे जमली की, आपण ऐकत नाही असा आभास निर्माण करीत सारे काही कानी कसे पडेल असे प्रयत्न करीत असतो. राजकारणी पुरुषाला वाटत असते की, सर्वत्र जणू त्याचीच चर्चा होत आहे. आणि 'वृक्षे वृक्षे' कोकिलांचाच आवाज ऐकणाऱ्या कवीप्रमाणे यत्र तत्र सर्वत्र आपलीच चर्चा, आपल्या पक्षाची टीका चालू आहे असे त्या राजकारणी पुरुषाला वाटत असते.

आणि असेच थोडेसे त्या दिवशी संध्याकाळी ओंकारेश्वराचे दर्शन घेऊन येताना घडले.

रस्त्यात तीन तीन चार चार सायकलवाले घोळका करून चर्चा करीत असतात. वाहतुकीला अडथळा करीत असतात. जणू बेफिकीरी व बेगुमान-

मराठी ग्रं... दा. क्र. १६६२३



पणा ह्यांचे ते घाऊक दुकानदारच. गेली दोन वर्षे रिकामपणाची कामगिरी म्हणून मी असल्या तरुणांना तसे करू नये म्हणून उपदेश करीत असतो. त्याचा परिणाम मनावर असा झाला आहे की, रस्त्यातून जाताना कोठे घोळका आहे का, असे स्वाभाविकपणे डोळे शोधत असतात !

ओंकारेश्वराकडून शनवार मारुतीकडे येणारा रस्ता तसा रहदारीचा नाही, आणि ज्या प्रकारची रहदारी त्या मार्गाने कित्येक शतके होत आहे, तीत भाग घेणारे कधी कोठे घोटाळत नाहीत, घुटमळत नाहीत ! जाताना कुणाला तरी खांद्यावर घेऊन ते जातात, येताना त्याला तेथेच सोडून परत येत असतात ! ओंकारेश्वर म्हणजे पुण्याच्या जीवनातील एक इतिहासप्रसिद्ध वास्तू आहे. पूर्वी त्या ठिकाणी मोठमोठाली कारस्थाने करणारे यशवंत, नामवंत, श्रीमंत अखेरच्या विश्रान्तीला येत असत. तसेच घरापलीकडे ज्यांचे नाव माहीत नाही, पत्नीने लग्नाच्या वेळी ज्याचे नाव उच्चारावे व पुन्हा कधी कुणी उच्चारू नये, अशाही लक्षावधी माणसांचे 'ओंकारेश्वर' हे आश्रयस्थान झाले आहे. आजही तीच परंपरा अव्याहतपणे, अव्यभिचारी निष्ठेने चालू आहे. समाजवाद व त्यातील समान संधी भारतात जेव्हा केव्हा स्थापन होईल ती होवो, पण ह्या स्मशानभूमीत किंबहुना मृत्यूच्या राज्यात सर्वांना सारखी संधी अनादिकालापासून मिळत आली आहे खरी !

मृत्यू हा समानतेचा आधार आहे, त्या तत्त्वज्ञानाचा उद्‌गाता आहे. ह्या स्मशानभूमीवर पेशवाईत बारभाईचे कारस्थान घडले आणि याच स्मशानभूमीसमोर कॉंग्रेस भवनात १२०० भाईंची २२०० कारस्थाने घडत आहेत. आणि त्या कारस्थानांचा परिणाम म्हणून सत्य हद्दपार झाले आहे, सौजन्य बाजूला टाकण्यात आले आहे, कपट सार्वजनिक जीवनाची मुंडावळ बनले आहे, अर्थासाठी शब्द नसून मनातील हेतू लपविण्यासाठी त्याचा उपयोग केला जात आहे.

रस्त्याने जातायेताना मनाचे डोळे व कान मी सताड उघडे ठेवून वावरत असतो. तारुण्यातील उन्मादी गुंगी आता इतिहासजमा झाली आहे. चिंतेचे निशाण वार्धक्याने ढासळत जाणाऱ्या किल्ल्यावर रोवले तथापि काही तरी करीत राहावे, ऐकत राहावे, असे सतत चाललेले असते !

भारताचे व जगाचे काय होणार ह्या विचारात थोडा गुंग असतानाच ओंकारेश्वराकडून मारुतीकडे जात होतो आणि तेवढ्यात "गोड क्षण-सुद्धा यांनी ठेवले नाहीत" अशी मधुर वाणी कानी आली! त्या दिशेने पाहिले. रस्त्याच्या कडेला तीन तरुणी उभ्या होत्या. तरुणी म्हणण्यापेक्षा थोड्या मध्यम वयाच्या विशीत प्रवेश करणाऱ्या अशा त्या विदुषी होत्या. दिव्याच्या उजेडात असल्याने त्यांचे चेहरे स्पष्ट दिसले आणि त्यावरून अल्लडपणाच्या वसंतातून त्या बाहेर पडल्या होत्या. थोडी प्रौढता, थोडी प्रसन्नता त्यांच्या चेहेऱ्यावर विलसत होती. त्या मधुर वाक्यातील 'त्यांनी' ह्या शब्दाने माझ्या मनाचे पाय घुटमळले! त्यांनी म्हणजे कोणी? हा प्रश्न साहजिकच माझ्यापुढे उभा राहिला!

सुमारे सतरा वर्षांपूर्वी उदेपूर येथील राजघराण्यातील प्रसिद्ध कलाकार ठाकूरसिंग ह्यांनी काढलेले चित्र पाहिले होते. त्या चित्रात विहिरीजवळ इतक्याच वयाच्या तीन तरुणी काढलेल्या होत्या. एकीची घागर पाण्याने भरलेली असून तिच्या शेजारीच ती उभी होती. दुसरीची तिच्या कडेवर होती आणि तिसरी आपली घागरिया विहिरीतून पाणी काढण्यासाठी वर खेचीत होती. त्या आपसात बोलत होत्या आणि काय बोलत होत्या ह्याचेच कोडे ठाकूरसिंग ह्यांना पडले होते! त्या चित्राचे नाव 'तिनकी बात कटे नाही, कटे दिनरात'. अनंत कालपर्यंत त्यांचे ते कुजबुजणे-बोलणे चालू आहे, असा अभिप्राय चित्रकाराने व्यक्त केला होता!

त्याच घटनेवर मी काही वर्षांपूर्वी एक शब्दचित्र रेखाटले होते. त्या तीन स्त्रिया म्हणजे प्रयत्न, आतुरता व तृप्ती ह्यांच्या देवता होत असे म्हटले होते. त्यांचे बोलणे कोणत्या विषयासंबंधी असेल ह्याबाबतही अनेक तर्क करून मी निष्फल ठरलो होतो.

गतरात्रीच्या मधुर स्मृती परस्परांना त्या सांगत असतील, सास्वांची गाऱ्हाणी गात असतील, नणंदांचे टोचून बोलणे सांगत असतील. दीर-देवरांच्या उलाढालींची चर्चा करीत असतील, पण अशी संशय-रत्नमाला गुंफत असताना निश्चित असा निर्णय काही करू शकलो नाही.

तसाच संशयभाव, विवंचना उत्पन्न करणारा नव्हे, पण मधुर सहानुभूतीला उल्हसितं करणारा– उत्पन्न झाला होता. वाक्यरचनेवरून बोलणारी स्त्री किंचित तरी साहित्यिका असावी, असा साहित्य संमेलनाचा माजी अध्यक्ष म्हणून मला साक्षात्कार झाला. त्यातल्या ‘ त्यांनी ’ म्हणजे कोणी हा प्रश्न यक्ष-प्रश्नाप्रमाणे माझ्यापुढे त्या एका क्षणात युगोच्या हट्टाने उभा राहिला ! मी तो सोडवू शकणार नाही, असे जवळजवळ वाटू लागले होते, तोच दुसऱ्या तरुणीने, “ कॅाँग्रेसनं जगणं कठीण केलं आहे ” हे शब्द उच्चारले ! यक्ष-प्रश्न दिवंगत झाला आणि माझ्यातील ‘ कॅाँग्रेस ’ मन जागृत झाले !

तसे म्हटले तर कॅाँग्रेसवर गेल्या दोन वर्षांत माझ्याइतकी टीका कोणीच केली नसेल. आणि कॅाँग्रेसच्या दृष्टीने म्हणजे कॅाँग्रेस दत्तकपुत्रांच्या दृष्टीने फाशी देण्याइतका गुन्हा मी करीत होतो ! लब्धप्रतिष्ठितांच्या मते मला म्हातारचळ लागला आहे असेही सांगितले जात आहे. काहींच्या मते विफलतेचा रोग मला जडला आहे. तथापि ह्या सर्व गोष्टी असूनही माझी जिव्हायात्रा चालूच आहे.

असे जरी असले तरी अन्य कोणी कॅाँग्रेसवर टीका अगर निंदा केली की स्वाभाविकपणे मी अस्वस्थ होतो ! कारण ती टीका कुळावर होते असे मला वाटते. किंबहुना, आई आपल्या मुलाला नावे ठेवते, प्रसंगी त्याचा कानही पिळते, पण तीच गोष्ट शेजारणीने केली की ती वाघिणीसारखी तिच्या अंगावर धावते, तसाच थोडा प्रकार येथे झाला.

भारतीयांना स्वातंत्र्यात अभिमानाने जगता यावे, म्हणून तर कॅाँग्रेस साठ वर्षे झगडली. तिच्या सुपुत्रांनी बलिदान केले आणि ती कॅाँग्रेस–जिच्या झेंड्याखाली दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, लोकमान्य टिळक, नामदार गोखले, म. गांधी, पं. नेहरू लढले व धारातीर्थी पतन पावले, ते कशासाठी ? जनतेने स्वाभिमानाने जगावे यासाठीच ना ? व्यक्तिशः अर्धशतक याच कार्यासाठी मी शरीर व मन, वाणी व लेखणी झिजवली ना ? तेव्हा मला किंचित राग यावा हे स्वाभाविक होते.

तथापि ती तरुणी जे म्हणाली ते सत्य होते. क्षणात माझ्या मनाच्या

कुरुक्षेत्रात सत्य व प्रतिष्ठा ह्यांचा तुमुल संघर्ष निर्माण झाला. तिच्या वाणीतून निघालेले सत्य कठोर होते, आणि तिला आकलन झाले नसेल एवढे ते व्यापक व विस्तारित होते. जे सत्य कठोर, ते मृदुवदनातून आले म्हणून कमी कठोर झाले होते असे नव्हे ! पण शान्तपणे स्पष्ट केलेले सत्य अधिकच कठोर होत असते !

तेवढेच वाक्य उच्चारून ती स्तब्ध राहिली आणि या संयमाने तिच्या शब्दांचा प्रभाव तीव्रतर झाला ! तिची पुढील शान्तता सुवर्णाची न ठरता, हातोडी स्वरूपाची पोलादी ठरली. तिचा आघात माझ्या मनाच्या भिंती फोडून आत लपलेल्या जाणीवेला, अस्मितेला जखमी करता झाला !

मी मनोमन विचार करू लागलो, जगणे अशक्य का झाले ? अन्नात माती कालवली आहे, का मातीत अन्न कालवले आहे ?–अशी समस्या आज उभी आहे.

ओंकारेश्वराच्या परिसरात होतो. पडलेली घरे उठाव करून स्मृतिरूपाने मनाला धक्का देत होती. " सरकारने काय केले ? " असे अपौरुष वाणीने केलेले आवाज क्षणभर कानावरती आले, कापडांच्या किंमती भरमसाट वाढल्या आहेत हे तर वाचीतच होतो, दरोड्यांच्या व दंग्यांच्या बातम्याही ठळक अक्षरांत चितेवर टोस्ट भाजून घ्यावा त्याप्रमाणे वर्तमानपत्रांत येत होत्या ! आदर्शासाठी मनुष्य जगतो म्हणतात; पण तसे आदर्श सार्वजनिक जीवनाच्या जुन्या बाजारात अडगळीत पडले होते. नव्या आदर्शात तरुणांना आकर्षण वाटत नव्हते. वृद्ध उदासीन होते, सत्तेचा बाजार गरम होता, व त्यात चारित्र्यहीनता, स्वार्थ ह्यांनाच तेजी आली होती ! ज्यासाठी मरावे असे मनाला उन्नत करणारे, त्यागासाठी स्पर्धा करावयास लावणारे, विचारांना धुंद करणारे असे काही– काही गेल्या पंधरा वर्षांत नजरेस येत नव्हते ! आणि आता तर नेहरूंनंतर आदर्शाच्या सृष्टीत पार काळोखच पडला होता !

किती यथार्थ होते त्या अनुभवी तरुणीचे ते शब्द ! असे मनात खळबळजनक वातावरण उत्पन्न झाले असताना, अगदी शान्तपणे त्या तरुणींच्या जवळ मी गेलो. त्यांच्याकडे पाहिले आणि त्यांची बोलणी अकृत्रिम होती,

याची खात्री झाली. भाडोत्री राग त्यांच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता, निर्मळ उदासीनता वावरत होती. मी जवळ जाऊन म्हणालो की, असे काय झाले की ते काँग्रेसने केले व असे काय झाले की सुखाचा गोड क्षणही राहिला नाही ? इतक्या शान्तपणे नम्रभावाने मी बोलत होतो की, त्याचा परिणाम त्यांच्यावर साहजिकच झाला असला पाहिजे.

त्यांच्या कुजबुजीतले सहज कानी पडलेले शब्द ऐकून मी हे करीत होतो. त्यांनी मला ओळखले की नाही हे सांगता येत नाही. त्यांनी मला नीट पाहिले, निरीक्षले; पण त्याचा परिणाम संकोचात झाला नाही. लाजल्यासारखे तर त्यांनी केलेच नाही. त्यांच्या पोशाखावरून व कुंकवाच्या आकारावरून त्या आधुनिक नव्हत्या ह्याची जाणीव तेव्हाच झाली, आणि त्या लाजल्या नाहीत ह्याचे कारण त्यांची तळमळ स्वाभाविक लज्जेला बाजूस सारून वाणीतून प्रकट झाली. ती मला उद्देशून म्हणाली, " ही माझी बहीण; सहा वर्षांनी मजकडे आली आहे, पण मला तिला साखरेचा साधा चहा देता आला नाही ! " इतक्या तळमळीने तिने उच्चारलेले ते शब्द साहित्यात गोड असले तरी सत्यसृष्टीत शराप्रमाणे होते ! त्यावर काय उत्तर द्यावे मला कळेना !

सहा वर्षांनी बहीण आली आणि तिचे आदरातिथ्य साध्या साखरेच्या चहाने करता आले नाही ह्यातील दुःख स्वाभाविक होते. त्यात कृत्रिमता नव्हती. त्यात राजकारणी भोंदूगिरी नव्हती, ढोंग नव्हते. बहाणेबाजी नव्हती. त्याजबरोबर वाममार्गाचा स्वीकार करून साखर तिने मिळविली नव्हती, हेही स्पष्ट झाले होते. मनात असे आले की, अशा तऱ्हेने साखर न घेता गुळाचा चहा तुम्ही दिलात तर त्याला अमृताचीच चव आली असती. पण लगेच असे वाटले की, हे शब्द मी उच्चारले तर ढोंगीपणा तर त्या मुलींना वाटणार नाही ना ? बोलण्यापूर्वी विवेक करण्याची सवय अलीकडे अलीकडे लागली आहे; आणि मग विचार केला की,–न बोलणे हेच उत्तम !

एकदा असे वाटले की, आपण त्यांना विवंचित करणारी परिस्थिती सोडण्यासाठी काय करीत आहोंत याची पराक्रमगाथा सांगावी. पण त्यांनी

त्यांचे समाधान झाले नसते; आणि कदाचित हा भंपकपणा ठरला असता असेही मनातील टीकाकाराने जाणवले ! त्यांच्याजवळ गेलोच नसतो तर ही आपत्ती आली नसती. चक्रव्यूहात गेलो आणि माझा अभिमन्यू झाला !– असे वाटले ! आपण अडलो, परिस्थितीला शरण गेलो. हा विचार पन्नास वर्षांच्या स्वमान्य कर्तृत्वाला कमीपणा आणणारा होता. बोलणे शक्य नव्हते, स्वस्थ बसणे परिस्थितीशी द्रोह होता. मोठ्या संकटात मी सापडलो; आणि त्याच सुमारास ओंकारेश्वराच्या अखंड यात्रेचा एक यात्रेकरू, ज्याला जीवनात लाथाडले असेल त्यालाच खांद्यावर घेऊन स्मशानाकडे येणारी यात्रा प्रकाशात येत आहे असे आढळून आले. धावा न करता हा यमराज धावून आला. त्या तरुणी एका दिशेने गेल्या. मीही दुसऱ्या दिशेने जाऊ लागलो. शान्तता, नम्रता व आतुरता यांच्या त्या देवता वाटल्या, आणि मी काही काळ तरी तेथे प्रकाश न देणाऱ्या नगरपालिकेच्या दीपकस्तंभासारखा उभा राहिलो ! अधिक म्हणजे मुखस्तंभ झालो, तथापि सुरवातीला दिलेले " एकही गोड क्षण त्यांनी ठेवला नाही " हे वाक्य गुणगुणत. तोच एक गोड क्षण समजून घराकडे मी परतलों......

* * *

# देवाचिये द्वारी

नाना फडणिसांना आपल्या आत्मचरित्रात पुण्यातील टवाळखोर वृत्ती-बद्दल आपले मत नमूद करून ठेवले आहे. त्यांच्या मताप्रमाणे पुण्यातल्या बातम्या सुतराम् निराधार असतात. पुण्यातील भांग्या मारुती हा त्या काळचा एक लहरींवर लहरी उचंबळून देणारा आकाशवाणीवजा कार्यक्रमाचा अड्डा होता, अगर केन्द्र होते. तुळशीबागेत, बेलबागेत, रामेश्वरी भिक्षुकवृंद जमला असता. सुगंध्याच्या दुकानी बुधवार पेठेत गप्पाष्टके चालू असताना बातम्यांचे पीक एवढे दिसून येई की जगाने आश्चर्यचकित व्हावे. आजही नगर-वाचनालयाच्या गॅलरीतील गप्पाष्टक मंडळ हेच कार्य करीत आहे. तसे पाहिले तर समाजाच्या जीवनात करमणुकीसाठी, विश्रान्तीसाठी माणसे एकत्र येतात. सुख-दुःखाच्या गोष्टी बोलतात. ( सामान्यपणे या गोष्टी वधू-जनांच्या – वधूधनांच्या) असतात. पुराण श्रवण करीत असताना, वाती वळत वळत अंबाकाकू सुनेची गाऱ्हाणी ठकूमावशीजवळ सांगत असतात. घारुताई जावयाचे पराक्रम गाऊन मुलीला कमी लेखत असतात. जुन्या समाजात मंदिरे ही विचार-विनिमयाची तशीच माहिती केन्द्रे असत. त्यांना सामाजिक जीवनात विशिष्ट स्थान असे. पुराण-श्रवणानंतर उपवर वधूंच्या चौकशा होत. लग्नाबद्दल बोलणी होत. तथापि सर्वच काही एवढ्यावरच समाप्त होत नसे. राजकारणातले हे बारकावे कुजबुजले जात. समाजातील किंवदंती वस्त्राआड ज्याप्रमाणे सौदे ठरत त्याप्रमाणे कानाशी लागून बोलल्या जात. ४० वर्षांपूर्वी वर्तमानपत्रे हळूहळू लोकमताला आकार देऊ लागली; पण १०० वर्षांपूर्वी ही परिस्थिती नव्हती. आणि पहिल्या महायुद्धाच्या वेळी

‘ देवाचिये द्वारी ’ जे युद्धात घडले नसेल तसले पराक्रम व पराभव ऐकू येत. मोठ्याने नव्हे, अगदी कानाशी लागून; आणि “ आमचा ‘ हा ’ कलेक्टर कचेरीत आहे, त्याने सांगितले असे अण्णा म्हणत.” मग तात्या उस्से भी जादा अशी लोणकढी ठेवून देत आणि तेही “ आपला एक जिगर दोस्त ‘ मुंबई ’ ऑफिसात आहे, त्याच्या साहेबाने त्याला सांगितले ” असे ठोकून देत. ज्याला सामाजिक शिस्त म्हणतात व जिची आवश्यकता राष्ट्रीय कालात आवश्यक असते, तसे काही या देशात आतापर्यंत अनुभवाला आले नाही. इंग्रज राज्य तर परक्यांचे, आणि त्याच्याविरुद्ध बातमी पसरवणे म्हणजे देशभक्ती असे मानले जाई. पहिल्या महायुद्धाच्या काळात प्रस्तुत लेखक कॉलेज जीवनात होता. तरीसुद्धा आळीतील मारुती व महादेव (ओंकारेश्वर) यांच्या दर्शनास जात असे, आणि अगदी गुप्त गुप्त बातम्या तेथे जमलेल्या लोकांत चर्चिलेल्या त्याने ऐकल्या आहेत. आणि आज हे सर्व आठवण्याचे कारण तसेच झाले आहे. रेडिओवरती बातम्या सकाळी, दुपारी, संध्याकाळी, रात्री लोक ऐकतच असतात, वर्तमानपत्रं तर नकोशी इतकी निघाली आहेत– आणि नको इतकं ती लिहीतच असतात. साक्षर लोकांची संख्या आता एकंदर देशात २२ टक्के झाली आहे. शहरातून तर ७० टक्के-पर्यंत गेली आहे. तथापि साक्षरता म्हणजे ज्ञान नव्हे व वाचणे म्हणजे विवेक नव्हे; हा अनुभव अजूनही ‘ चालू नाणे ’ आहे. आणि आजही गप्पा-मंडळांतून, सुगंध्यांच्या दुकानांतून, मंडईतून, भांग्या मारुती रेडिओ-तून न घडलेल्या बातम्या प्रक्षेपित करण्याचे कार्य चालूच आहे. सुतावरून स्वर्गाला जाणे, या म्हणीत सुताची तरी आवश्यकता असते. भांग्या मारुती रेडिओला त्याचीही आवश्यकता लागत नाही. कवीने शून्यातून परार्धे काढली. आमचा हा गप्पीदास शून्याशिवाय घटनेचे जग घडवीत आहे. आणि आपला परंपरागत लौकिक कायम ठेवीत आहे. असे सांगतात की, नाना फडणीसांच्याकडे सर्व कलावंतांची कदर होत असे; गुणग्रहण होत असे. आणि अशाच एका प्रसंगी एक गृहस्थ नाना फडणीसांकडे पुरस्कारार्थ आला. नानांनी विचारले, ‘ कोणती कला आपल्याला येते ? ’

त्याने सांगितले, ‘ मी उत्कृष्ट थापा मारतो ! ’ नानांनी प्रकरण

हसण्यावारी नेले आणि त्याला वाटेला लावले. त्या महाभागाने मग आपल्या कलेचा प्रसार नानांना दाखवण्याचा निश्चय केला आणि तो भांग्या मारुतीच्या देवळात आला. थोडी शांभवी घेतली आणि रस्त्यावरून जाणाऱ्या सैन्यातील एका पखालवाल्याला म्हणाला, ' भाई हसन, आता तयारी कर. असा स्वस्थ काय बसलास ? ' त्याने विचारले, ' शास्त्रीबुवा, आता कशाची तयारी करायची ? ' शास्त्रीबुवाने सांगितले की, ' श्रीमंतांनी टिपूवर स्वारी करायचं ठरवलं आहे.' शास्त्रीबुवांचा तो भव्य चेहरा, त्यांचा तो प्रतिष्ठित पोषाख व एकंदर बोलण्याची ऐट पाहून हसनला खरे वाटले आणि त्याने मग हुसेनला सांगितले. हुसेनने दाऊदला सांगितले. दाऊदने आपल्या शिलेदाराला सांगितले. शिलेदाराने पागेतल्या लोकांना सांगितले. त्यांनी फडातल्या लोकांना सांगितले. खाजगीतून मग पत्रे गेली. आणि दोन महिन्यांच्या आत दसऱ्याच्या आधी शिंदे आले, होळकर आले, धारकर आले, देवासकर आले, सेनाखासखेल, गाइकवाड आले. ' दक्षिण दिक्पाल ' पटवर्धन आले, आणि जो तो एकमेकाला विचारू लागला,– स्वारीला कोणता मुहूर्त धरला आहे ? गारपीर माणसांनी गजबजला. छावणीतून पोवाडे ऐकू येऊ लागले. पंचकल्याणी घोडे नाचू लागले. शिपायांनी व शिबंद्यांनी शस्त्रास्त्रे साफ केली. तथापि केव्हा स्वारीला निघावयाचे, त्या मुहूर्ताचा पत्ता कुणालाच नव्हता. शेवटी काही सरदार मंडळी नाना फडणीसांच्याकडे गेली व विचारले, की ' स्वारीचा मुहूर्त केव्हा ठरवला ? आम्ही सगळे इथं आलो. आज महिना झाला. दाणागोटा संपत आला.' नाना आश्चर्यचकित झाले. ' कोणती स्वारी, कुठला मुहूर्त ? ' मग ते म्हणाले की, ' आम्हांला पत्रं आली—' व नानांच्या ध्यानात आले की, काही तरी गडबड झालेली दिसते ! नाना ' ज्ञानगभस्ती ' असल्यामुळे त्यांनी शोधून पाहण्याचे ठरवले आणि मग खाजगीत चौकशी केली; फडात, पागेत चौकशी केली; शिलेदाराला विचारले, दाऊदला, हुसेनला, हसनला विचारले; आणि मग हसनने शास्त्रीबुवांची हकिगत सांगितली– व अफवेची उतरंड शास्त्रीबुवांच्या कुशल मस्तकघरापर्यंत पोचली ! नानांनी त्यांना बोलावले व विचारले की ' हे तुम्ही का सांगितले ? ' त्या महाभागाने उत्तर दिले,

'मी पुरस्कार मागितला, माझी कदर तुम्ही केली नाही. माझ्या अभिमानानं डंख धरला आणि मी माझ्या कलेचा नमुना दाखवण्याचं ठरवलं.' नानांनी विचारले, 'काही आधार तरी होता का तुला ?'

त्याने 'होय' म्हणून सांगितले व म्हणाला की, 'शिलंगणाच्या वेळी श्रीमंतांनी अंबारीत असताना दक्षिणेकडे पाहून मिशी पिळली आणि मी कयास केला की, 'दक्षिणेतील शत्रू म्हणजे टिपू– त्यावर स्वारी होणार !'

नानांनी त्याला बक्षिस दिले आणि पुन्हा असा पराक्रम न करण्याबद्दल सांगितले. ही थापेबाजांची कलात्मक परंपरा आजही चालू आहे. आता भांग्यामारुती हे एकच केन्द्र राहिले नसून कर्तनालये, उपाहारगृहे, मारुतीचे कट्टे इत्यादी सर्व केन्द्रे झाली आहेत.

त्या दिवशी संध्याकाळी नेहमीप्रमाणे ओंकारेश्वराच्या दर्शनार्थ गेलो होतो. तो दिवस संचारबंदीचा ठरला होता. तथापि प्रकाशबंदीचा काटा बारावर आला नव्हता. एका माथेफिरूने श्रीगजाननाचा त्रिशूळधारी हात तोडला होता. तोडणारा मुसलमान होता. आणि महिनाभर चाललेल्या काश्मीरच्या कश्मकश्‌मध्ये लोकांचा विवेक चिरडून गेला होता. वास्तविक पाक मुसलमान मुसलमानांशी लढत होते. त्यांची कत्तल करीत होते. त्यांच्या संपत्तीची लूटमार करीत होते, आणि चीड मात्र आली पुण्यातील बुद्धिमान समजणाऱ्या नागरिकांना. आणि तिने जातीय वळण घेतले, मुसलमानांच्या मशिदी मोडल्या, मालमत्तेची नासधूस झाली.–प्राणहानी झाली नाही हे सुदैव. भारतीय संस्कृतीचा आत्मा सहिष्णुता, हिंदू संस्कृतीचा आत्मा सहिष्णुता, त्याला रामराम ठोकण्यात आला, आणि मुसलमानांवर राग काढता काढता दंगेखोर हिंदू मनाने मुसलमान झाला, हाच अर्थ या घटनेचा मी केला होता. संचारबंदी झाली. नित्याचे व्यवहार गडबडले, गोंधळ उत्पन्न झाला, आणि एरव्ही पिकणाऱ्या बातम्यांना आता ऊत आला होता. ओंकारेश्वराच्या देवडीजवळ मी उभा होतो. जवळच भग्न नंदी होता. अस्मानी काय करू शकते याचे पुरावे उद्‌ध्वस्त स्थितीत दिसत होते. नर–नारी घाईघाईने दर्शन घेऊन परतत होते. आणि तेवढ्यात कुजबुजत होते. एक गृहस्थ मजजवळ आले आणि म्हणाले,

'आता जरा सरकार जागं झालेलं दिसतं. आम्ही म्हणतच होतो की, मुसलमान अधिकाऱ्यावर विश्वास ठेवू नका. बरं झालं, त्याला अटक करण्यात आली.' मी काहीच बोललो नाही. मग त्या गृहस्थाने अटकेची तपशीलवार हकिगत सांगितली. मी काहीच बोलत नव्हतो. अशा ढबात तो सांगत होता की जणू त्याने प्रत्यक्ष पाहिले आहे. मी हळूच त्याला विचारले, 'केव्हा अटक झाली ?' त्याने सांगितले, 'आज पहाटे. आणि आमचे रामभाऊ सांगत होते की, चार वाजेपर्यंत तो कचेरीत आला नाही. आता त्याला म्हणावं तुझे इस्लामी चाळे खुशाल येरवड्यात कर.' मी त्या गृहस्थाला म्हणालो, 'तुम्ही चौकशी केलीत का ? खोट्या अफवा पसरवणं हा गुन्हा आहे.' त्याने उत्तर दिले, 'मी पैज मारायला तयार आहे !' मग मी गंभीर होऊन सांगितले की, 'इथं येण्यापूर्वी १५ मिनिटंच त्याचं व माझं बोलणं टेलिफोनवर झालं आहे. त्याला अटक झाली नाही. तुम्हांला जर फजिती करून घ्यायची नसेल तर यापुढं कोणाजवळ बोलू नका.' आणि मग एवढ्यात दुसरे गृहस्थ देवळातून आले आणि म्हणाले, 'काका-साहेब, द्या टाळी. बरं केलं,—त्या पोलीस कमिशनरला अटक केली. आहेतच आमचे बाळासाहेब तसे खंबीर आणि पोलादी.' मी म्हणालो, 'बापू, मला काही उलगडा होत नाही.' 'अहो ! उलगडा म्हणजे काय ? तो मशीददुल्ला का मशीदुल्ला आहे ना ? त्याला अटक केली.' मी म्हणालो, 'तुम्हांला कुणी सांगितलं ?' 'अहो आमच्या शेजारी एकजण राहतात. ते डी. एस्. पी. च्या कचेरीत असतात. साहेब डेप्युटीशी बोलताना त्यांनी ऐकलं, आणि त्यानं मला म्हणून बातमी सांगितली,—आणि मी तुम्हांला सांगतोय.' मी म्हणालो, 'तसं काही झालं नाही. तसं झालं असतं तर रेडिओवर सांगितलं असतं. असली बातमी कधी छपून राहते का ?' एवढ्यात आणखी एक गृहस्थ आला आणि बापूंना म्हणाला, 'अहो, काय थाप तुम्ही दिली ? आताच पोलीस कमिशनरच्या निवेदनाचा भाग मी इथं रेडिओवर ऐकला.' मी म्हणालो, 'बरं झालं. परस्पर कान टोचले गेले. देवाचिये द्वारी या दोन मुक्ती मला लाभल्या ! आणि आता मी निघणार एवढ्यात एक तरुण पांढरी टोपी घातलेला देवळात जाण्यासाठी म्हणून देवडीजवळ आला. मला त्याने

पाहिले व म्हणाला, ‘अहो माझं भविष्य खरं झालं.’ मी विचारले, ‘कसलं ?’ ‘आयुबला हाउस-अॅरेस्ट (गृहबंध) करण्यात आलं. आता परिस्थिती ताबडतोब बदलेल.’ मी त्याला विचारले, ‘कुठं वाचलंस ? कुठं ऐकलंस ?’ त्याने सांगितले एका चिंधीवजा वर्तमानपत्राचे नाव. त्यात असे लिहिले होते की, तो म्हणाला, ‘आयुब एकान्तवासासाठी एका खेडेगावात गेला आहे’ आणि पुढे लिहिले होते की ‘त्याला गृहबंध करण्यात आलं आहे !’ मी म्हणालो, ‘गड्या हे खरं नाही. असं होईल पण इतक्या लवकर नाही. त्याचं पतन राजकीय कुंडलीत आहे. पण क्षण आला नाही. अफवेवर विश्वास ठेवून जनतेचं मन बिचकवू नये व भलतंच उल्हसित करू नये. अयुब पठाण आहे, आणि पठाणाची मौत तो मरेल.—पण तो पलायन करणार नाही.’ त्याचा विरस झाला. ‘आयुब पहिल्या झटक्याच्या पराभवानं अप्रतिष्ठित होईल पण अपदस्थ होणार नाही. हुकूमशाहीत हुकूमशहाची शक्ती नसते हे खरं. ती देशातील एका शक्तिशाली गटात असते. आयुबचा गट म्हणजे वायव्य प्रान्तातील पठाण हे होत. गेल्या निवडणुकीत त्यांनीच मताची मोर्चेलं त्यावर धरली म्हणूनच त्याचा ताबूत उभा राहिला.’ असे मी त्याला सांगत आहे तोच एक मध्यमवयीन गृहस्थ देवळातून देवडीजवळ आला आणि मोठ्या आनंदाने सांगू लागला की, ‘अहो, लाहोर पडलं ! आणि मी पेढे देवाला वाटले.’ असे म्हणून सुपारीएवढा पेढा त्याने माझ्यापुढे केला. परिस्थितीप्रमाणे पेढ्याचा आकारही संकुचित होता. सहस्रभोजनाचा अर्थ आता १० माणसे अशी परिस्थिती झाल्याची तो पेढा ही निशाणी होती. मी म्हणालो, ‘रावजी ! तुम्हांला कुणी सांगितलं लाहोर पडलं म्हणून ?’

ते म्हणाले, ‘अहो हे काय पुसता ? वर्तमानपत्रात आलं.’ मी म्हणालो, ‘कांही वर्तमानपत्रातल्या बातम्या काकडीला मीठ लावून खावं त्याप्रमाणं घेतल्या पाहिजेत. कुठल्याही झाडाचे फळ पहिल्या झटक्यास पडत नाही. आणि लाहोर तर पाकिस्तानच्या मयूराचा तुरा आहे. ते पडलं म्हणजे पाक पडलं असा अर्थ आहे.’

‘अहो काका, तुम्ही काय बोलता ? ज्या पत्रात वाचलं ते पत्र म्हणजे एक वेळ

सूर्य उगवायची वेळ चुकेल पण ते पत्र चुकणार नाही, असा त्याचा बाणा आहे. साऱ्या जगाला ते शहाणपणाचा व संयमाचा उपदेश करीत असतं.' मी त्याला म्हणालो, 'कालच त्याच्या बातमीदारानं मला फोन करून लाहोर पडलं या बातमीवर माझी प्रतिक्रिया विचारली होती. मी अंथरुणावर पडलो होतो व काही सांगावयाचं नाकारलं. मला गोष्ट खरी वाटली नाही व तेच खरं ठरलं. वाघा हे सरहद्दीवर ठिकाण आहे, आपल्या हद्दीत. तेथून लाहोर १४ मैल आहे, आणि पल्ला गाठायला १४ आठवडे तरी लागतील अशी माझी बुद्धी मला सांगते. प्रदेश सखल आहे पण त्यात रावीच्या कालव्याचं जाळं पसरलं आहे. शिवाय सैनिकी योजनेत लाहोर हे पाकिस्तानचं हृदय आहे. वाहतुकीचा मोठा कट्टा आहे. ते इतक्या लवकर पडणार नाही. कदाचित पडण्यापूर्वी आणखी काही घटना घडतील.' माझी ही वाणी ऐकून माझ्या श्रोत्याला म्हणजे रावजींना प्रथम संताप आला. नंतर ते खिन्न झाले. नंतर उदासीन झाले, आणि त्यातून मग विवेकाचे गांभीर्य त्यांच्या चेहऱ्यावर दिसू लागले. ते म्हणाले, 'होय काकासाहेब ! तुम्ही तिकडे होता ! तुम्हांला त्या प्रदेशाची माहिती. पण आम्ही अडाणी व अज्ञानी. ही वर्तमानपत्रं तरी असं का लिहितात ?' मी काही बोललो नाही व विचार करू लागलो की, स्वातंत्र्याबरोबर आलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याला अवश्य ती मानसिक शक्ती व समतोल आमच्यात आला नाही याचा खेद वाटतो. देवाच्या द्वारी सर्वसाक्षी व सर्वज्ञाच्या अशा अफवा पसराव्यात याचा खेद झाला. जेथे देवाच्या द्वारी क्षणभर उभे राहून चारी मुक्ती साधावयाच्या तेथे शहाणपणाला, विवेकाला, चातुर्याला व चाणाक्षपणाला मुक्ती मिळत आहे– हे पाहून अधिकच वाईट वाटले ! रावजीभाईंनी दिलेला पेढा हातातच होता. त्याची गोडी मला नव्हती. पण त्या निमित्ताने व त्याच्याकडे पहात पहात त्यातून साहित्याची गोडी निर्माण झाली. तरी पण तो पेढा मी खाल्ला नाही व शेजारी उभ्या असलेल्या लहान अर्भकाला दिला. रावजीभाई पेढे न वाटता मार्गस्थ झाले. मी त्यांचा विचार करीत मार्गस्थ झालो.

* * *

# जगणे अपरिहार्य आहे म्हणूनच जगत आहे !

सौंदर्य आणि बोध हा वास्तविक साहित्यिक क्षेत्रातील विषय; तथापि काही स्वागतार्ह अपघातामुळे त्या क्षेत्रात माझे थोडे पदार्पण झाले, आणि थोडीशी मुशाफिरी पण केली,– करीतही आहे. परिणामतः काही पुस्तके अभिप्रायार्थ, काही भेटीदाखल, काही ‘ विद्वत्ताप्रचुर ’ प्रस्तावनेसाठी येत असतात. असेच एक पुस्तक, एका वृद्ध साहित्यिकाने परवा भेटीदाखल दिले. ते पुस्तक वाचत होतो. सघन होते. तर्क व विद्वत्ता यांनी परिपूर्ण होते. विषयाची मांडणी आकर्षक होती. नेहमीप्रमाणे संध्याकाळ झाली म्हणून व एका व्याख्यानाला अध्यक्ष म्हणून मला जावयाचे असल्याने, पुस्तकात खूण घालून ते संग्रहात ठेवले. बाहेर पडलो पण मनात पुस्तकातील मुख्य प्रमेय, ‘ सौंदर्य हे वस्तुनिष्ठ का व्यक्तिनिष्ठ ’ याचा विचार करीतच मी सभास्थानाकडे निघालो.

रस्त्याने माणसे चालली होती. विविध रंगांची. स्त्री आणि पुरुष दोन्हीही. ‘ क्वचित रामा रम्या ’पासून ‘ क्वचिदपि जर्जर तनु ’ असे सारे दिसत होते. वानराप्रमाणे वागडणाऱ्या मिस्किल मुलांपासून रामेश्वरी निघालेल्या वृद्ध विद्वान ब्राह्मणापर्यंत अनेक व्यक्ती पाहात होतो. मुळात सौंदर्य आहे की नाही हे पाहणाराने ठरवावयाचे,– आणि त्याचा सौंदर्य-विषयक दृष्टिकोण जसा असेल त्याप्रमाणे ते ठरणार ! जीवनाकडे तरी आपण म्हणू व मानू त्याप्रमाणेच दृष्टी असणार व त्यानुसारच हा संसार अमृतमय किंवा विषमय होणार !

असाच काहीसा विचार डोक्यामध्ये चालू असतानाच मुख्य रस्त्याच्या

कोपऱ्यापर्यंत आलो. तेवढ्यात बऱ्याच दिवसांत न भेटलेले नानासाहेब मुख्य दरवाजाला लागून असलेल्या जोत्यावर दिसले. जाणाऱ्या-येणाऱ्याकडे ते बघत होते. त्याच कट्ट्यावरती एक उसाचे गुऱ्हाळ होते. म्हणजे उसापासून रस काढला जात होता, मात्र माणसे तो चरक ओढत होती. एकदा चिरडलेली उसाची कांडी चरकात घालण्यासाठी पडलेली होती. त्या ढिगाऱ्यापासून सुमारे ७--८ फुटांवरच नानासाहेब बसले होते.

ऐन वयात पुण्यातील रसवंतीचा मी एक रसिक भोक्ता होतो. आता मनात तेवढी गोडी राहिली नाही असे नाही; पण सामाजिक प्रतिष्ठा वाढली आहे ना ! त्यामुळेच मनात आले तरी कसा जाणार ? पाहता पाहता समाजात केवढे बदल झाले आहेत. बदलले नाहीत ते नानासाहेब ! जमीन बदलली, बदलला नाही गुलमहंमद– जहाँजुम्मद, जमींजुम्मद न जुम्मद गुलमहंमद ! असे न बदलणारे गुलमहंमद– यांना जुळवून घेणे कठीण होते. हा प्रश्न काही आजचाच नाही, तो अनंत कालापासूनचा आहे.

शान्त, किंचित खिन्न असे नानासाहेब दिसत होते. बऱ्याच दिवसांनी पाहिल्यामुळे मी सहज त्यांच्याजवळ गेलो, व दोन तरुण मिळाले म्हणजे नोकरीच्या गोष्टी बोलतात; दोन वृद्ध स्त्रिया भेटल्या म्हणजे मुलींचे कौतुक व सुनेच्या तक्रारी करतात,– त्याचप्रमाणे दोन वृद्ध भेटले म्हणजे प्रकृती व संसारातील परिवर्तनाबद्दल सखेद आश्चर्य व्यक्त करीत असतात. आणि नेमकी तीच गोष्ट आमच्या चर्चेचा विषय झाली. ‘ क्या क्या बनेगी मिलेंगे अगर दो दीवाने !’ ( काय काय गोष्टी होतील जर दोन चक्रम एकत्र आले तर ! ) तसेच काहीसे झाले. फरक एवढाच, आमच्यापैकी कुणीच ‘ चक्रम ’ नव्हते, निदान नानासाहेब तरी नव्हते !

दिनचर्या चर्चिली गेली. खाद्यपेयांचा विचार झाला. मीही सांगितले, ‘ आता सत्तरी संपत आली, तेव्हा बोलण्यात नसले तरी खाण्यात तोंड आवरलं आहे. ’

त्यावर ते म्हणाले, ‘ माझी पंचाऐंशी पुरी झाली. डोळे असून पाहवत नाही, कान असून ऐकवत नाही, गती असून चालवत नाही ! सारं बदललं आहे. खरं म्हणाल तर हुकूम नसलेला पत्ता मी झालो आहे.’ त्यांच्या स्वाभा-

विक व सरळ बोलण्याचा मी मार्मिक अर्थ घेतला. मनुष्य डाव खेळतच असतो. कारण तो संपावयाचा असतो. हुकुमी पत्ता नाही याची दुःखद जाणीव त्याला असते. पण पुरा करण्याचे कर्तव्य त्याचे मन बाजूला सारू शकत नाही. विवेक तसा सल्ला देत नाही.

नानासाहेबांचे तसेच झाले होते. नातवंडे पंतवंडे सभोवती होती. प्रत्येक पिढीतील बदल आचारात--विचारात दररोज दृष्टोत्पत्तीस येत होता.

मी विचारले, ' दिवस कसा काढता ? '

' माझ्यासाठी तो काही थांबत नाही. ' त्यांनी उत्तर दिले. ते पुढे म्हणाले, ' अपरिहार्य तेवढंच करीत असतो.'

आता चेंडू माझ्या भागात आला होता. मीही आत्मनिरीक्षण करू लागलो. मी अजून डोळ्यांनी पाहात आहे, बरेचसे नको तेही ! जेथे नम्रता पाहिली तेथे आता उद्धटपणा वावरताना दिसत आहे. विनम्रता क्वचितच भेटते. विद्येला विनयाने शोभा येते असे आता दिसत नाही. काही नवीनच पाहात आहे. समाजाने ज्यांना गांडुळाप्रमाणे मानले ते आता वासुकीची पिल्ले झालेली दिसत आहेत ! अपमानाचा पर लागताच स्वाभिमानाचा फणा उभारत आहेत. पण त्या फण्यावर एकीचा दशम अंक नाही ! खोटी नाणी व खरी नाणी वरवर सारखीच दिसतात. तसे आज वरवर समानतेचे साम्राज्य वाढलेले दिसत आहे. जहरी विषमता खपलेखाली जखम असावी त्याप्रमाणे वावरत आहे. ते दृश्य पाहू नये असे वाटते– आणि मनाचे डोळे नेमके तेच दाखवतात ! कानांनी ऐकत आहे, काही नावीन्य-पूर्ण, काही मधुर, काही मंजुळ, काही किंचाळलेले. पण कानात अगर डोळ्यात, श्रुतीत अगर दृष्टीत अजून अपरिहार्यता आलेली नाही. मनाला हवा तो विकल्प अजूनही निवडता येण्यासारखा आहे. पायांना गती आहे आणि पाय गती पण घेत आहेत. जेथे जातो तेथे कर्म सांगाती आहेच, आणि त्याला मी धोका देऊ इच्छित नाही ! आता त्यात कौशल्य कमी आहे असे नाही. आणि जीवनात– जाणिवेच्या पाच तपांवरील जीवनात आढळून आलेले परिवर्तन मी पाहात आलो आहे. प्रवाह म्हटला म्हणजे तो गतिमानच असणार. प्रवाहात उतरावयाचे व वाहात चालले

म्हणून तक्रार करावयाची हे बरोबर नाही. कौशल्य प्रवाहात राहण्याचे व प्रवाहाबरोबर न वाहण्यात आहे, आणि म्हणून प्रवाहात शरीर असले तरी डोके प्रवाहावर असले पाहिजे.

पिढ्यान् पिढ्यांचा अगतिक समाज इंग्रजी अंमलापासूनच बदलू लागला. पूर्वी राजधानीत काही झाले तरी राजुरी खेडेगावात मागील अंकावरून पुढेच चालू असे. गावचा जोशी पंचांग सांगे, कोळी पाणी भरी, गुरव पत्रावळी देई. जागल्या पहारा करी. सर्व काही परंपरागत. रेखीव आणि म्हणून मनाला शान्त ठेवणारे ! रक्तदाब होता. पण फक्त आयुर्वेदात ! कारण सामाजिक जीवनात त्या वेळी प्रक्षुब्धता नव्हती. वैयक्तिक जीवनात तर क्वचितच व तीही नाममात्र ! पाश्चात्य विद्या इंग्रजांच्या राज्याबरोबर आली, तिने सामाजिक जीवनाची चौकट मोडून टाकली ! का व कसे हे दोन भुंगे सामाजिक स्थैर्याच्या तुळईत शिरले. ती पोखरली गेली. बुद्धिवाद असे नाव देण्यात आले आणि श्रद्धा कानसली गेली ! सुधारकी उत्साह अतिरेकाने मातला आणि जुने तेवढे सोने हे जसे वनवासी झाले तसेच नवे ते श्रेष्ठ हे सिंहासनाधिष्ठ झाले ! आजोबा, वडील व मुलगा अशा तीन पिढ्यांत एकाच वेळी तीन चार आचार दिसू लागले ! समाजात व घरातही त्याचा दुखःद परिणाम घडू लागला. नानासाहेबांवर तसा तो झाला होता ! त्यांच्यावरच काय आम्हा सर्वच सत्तरीवरच्या माणसांवर झाला आहे !

आचारप्रभवो धर्मः। धर्मस्य प्रभुरक्षितः॥ आता धर्म आचरणावर राहिला नाही आणि त्याचे प्रभुत्व कोणा अच्युताच्या हातातही नाही. आता अच्युताच्या जागी सिनेमागृहे आली आहेत, आणि या ‘ धर्ममंदिरा ’-तून नव्या नीतीचे पाठ दिले जात आहेत ! मनामध्ये समाजपरिवर्तनाचा विचार करीत होतो; नानासाहेबांशी बोलत होतो;– आणि त्यांच्या पुढील पिढ्यांबद्दल चौकशी करीत होतो. ते जे सांगत होते ते सर्वांच्याच अनुभवाला येत होते. नवीन पिढीत जुन्याबद्दल जाणिवेने अनादर होता असे नव्हे. पण आदराची मूल्ये व माध्यमे बदलली होती. कुटुंब ही मध्यवर्ती संस्था, व त्या एकखांबी द्वारकेवर समाजाचे स्थैर्य उभारले होते. आता व्यक्ती हीच

साऱ्या जीवनाचे केन्द्र बनली होती. 'मी समाजासाठी नसून समाज माझ्यासाठी' ही भावना आज अधिक प्रखर व अधिक प्रभावी होत आहे.

समाज व व्यक्ती यांचे संबंध प्राचीन काळापासून कायमचे असे कधीच निश्चित झालेले नाहीत, युगाप्रमाणे ते बदलत असतात. 'राष्ट्र म्हणजे सर्व काही' हे तत्त्व काही काळ प्रभावी ठरले होते. त्याचीच निराळ्या संदर्भातील दुसरी आवृत्ती अगर प्रतिमा साम्यवादी राष्ट्रात होती. तेथे व्यक्ती सामान्य, समाज असामान्य;– त्याला अग्रहक्क, त्याला अग्रमान !. प्राचीन भारतीय संस्कृतीत व्यक्ती व समष्टी यांचा समन्वय केलेला होता. पण हा समतोल ब्रिटिश राज्यानंतर उघड उघड बिघडला. त्याचाच परिणाम व्यक्तिनिष्ठा अधिक प्रभावी झाली. व्यक्तिगत स्वार्थ हेच मग ध्येय ठरले. ते ठरताच इतरांसाठी त्याग हे जीवनमूल्य अर्थशून्य झाले. वृद्ध सासूसासरे यांची सेवा करण्यात सुनांना धर्म वाटेनासा झाला. त्यांना कुठे ठेवावे हा प्रश्न वर्तमानपत्रांतून चर्चिला जाऊ लागला ! सामाजिक परिस्थिती बदलली. एकत्र कुटुंबे नाहीशी झाली. सारा समाजच बदलून गेला.

वर्णाश्रमधर्म व एकत्र कुटुंबमिळकत या दोन कारणांनी हजारो वर्षे स्थिर व शान्त असलेला हिन्दू समाज, ही कारणे कमी होताच विस्कळित झाला. स्थितिमान हिन्दू समाज गतिमान झाला व अस्थिरतेला पाय फुटले. योग्य मार्गदर्शनाच्या अभावी प्रवाहपतित्व आले. कुठेही निघालेला आवाज जगभर प्रतिनिनादित होऊ लागला. भारतीय जीवन साऱ्या जगातील जीवनविषयक प्रवाहात सापडले !

नानासाहेब सांगत होते मुलाची कथा, नातवाची नवकथा; मी ऐकत होतो. मनात स्वानुभवाशी तुलना करीत होतो. नानासाहेबांचे मनोधैर्य अलौकिक वाटत होते. निर्विकार मनाने शेजारच्या गुऱ्हाळातील मनुष्य मोळीतील ऊस काढून कोयत्याच्या झटक्याने शेंडे--बुडखे तोडीत होता, त्याविरहित दांडक्याचे तुकडे करीत होता व त्यांना चरकात टाकीत होता. मला क्षणभर तो इतिहासाचा प्रतिनिधी वाटला ! जगाचा स्रष्टा दिनयामिनी यांच्या साहाय्याने चरक चालवून इतिहासाने केलेल्या तुकड्यांचा रस लोकजीवनाला पुरवीत असतो, त्यावर लोकव्यवहार चालवण्याची जबाबदारी

आहे. प्रसंगी निःसत्त्व झालेली उसाची चिपाडेसुद्धा ऊसवाला पुन्हा चरकात टाकत होता. परमेश्वरही त्याचप्रमाणे करीत आहे असे क्षणभर वाटले.

नानासाहेब सांगत होते, ‘ सर्व शान्तपणे पाहात आहे. कारण पाहणे अपरिहार्य झाले आहे. सोडून जाऊ म्हटले तर ते शक्य नाही. म्हणून जे आहे व होत आहे त्याला तोंड दिले पाहिजे. मरणाचा विचार आणू नये. अशुभ चिंतू नये असे शास्त्र सांगते. संतांची तशीच शिकवणूक आहे. म्हणून पंचाऐशी उलटली तरी, जीवनाची अधिक इच्छा नसली तरी, मरणाची इच्छा मनात आणीत नाही.’

मी सारे ऐकत होतो आणि एका मुस्लिम फकिराची उक्ती आठवत होतो. त्याने म्हटले आहे, ‘ मला पळता येत नाही म्हणून मी लढत आहे.’ हाच अर्थ नानासाहेबांच्या बोलण्यात होता ! जगावयाचे आहे. मृत्यूची इच्छा करणे पाप आहे. इतकेच नव्हे तर, ती इच्छा करणे म्हणजे परमेश्वराशी एक प्रकारे अकृतज्ञता दाखवणे होय. म्हणून जगणे भाग आहे, आणि मग जगावयाचेच आहे, आणि ते जगणे अपरिहार्यच आहे,– तर मग स्वधर्म करीत करीत का न जगा ? कुरकुर करून मनाची आत्महत्या का करायची ? आणि हाच विचार मनामध्ये उद्‌भवताच मी नानांची रजा घेतली. मनात तोच विचार घोळवीत मी व्याख्यानाच्या जागेकडे निघालो.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
आ. क्र. १६६२३
ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ४९१.०९ वि: निबंध
क्रमांक १७७१४ नों. दि. ५।३।६८

REFBK-0016623